

# भंगारातून सोने

## कल्पना शर्मा

1948 साल. तिरुकोय्यूर, तामिळनाडूतील दक्षिण अरकॉट जिल्ह्यातले गाव. तिथला 18 वर्षांचा तरुण मुंबईत आला. शहराबद्दल किंवा शहरी आयुष्याबद्दल त्याला विशेष माहिती नव्हती. पण स्वत:च्या दुष्काळग्रस्त गावात जगणं मुश्किल झाल्यामुळे तो मोठ्या हिंमतीने मुंबईत येऊन थडकला होता.

शमसुद्दीनला वाटलं होतं की तो एका मोठ्या शहरात येतोय. पण आल्यावर त्याच्या लक्षात आलं की तो धारावी नावाच्या एका दलदलीत आलाय, जिथे त्याचे मामा शेख हुसेन रहात होते. ते तर 1914 पासून या दलदलीत राहात होते. ''मला माझ्या मामांच्या तांदूळाचा चोरटा व्यापार करण्याच्या धंद्यात काम मिळालं. त्या काळी शहराची हद्द माहीमला संपायची, म्हणजेच माझे मामा आणि मामेभाऊ जिथे राहायचे त्याच्या पश्चिमेकडे''. शहराच्या हद्दीबाहेरून आणलेल्या धान्यावर कर आकारला जात असे. पण शेख हुसेन, त्यांचे तीन मुलगे आणि नुकताच मुंबईत येऊन राहिलेला त्याचा भाचा या सगळ्यांनी मिळून या व्यवस्थेतून मार्ग काढणारी पळवाट शोधून काढली होती.

''मी आणि माझे मामेभाऊ दररोज दूरवर - विरारला अनेकदा जाऊन यायचो. विरार तेव्हा मुंबई शहराच्या हद्दीबाहेर होतं. तिथे एक पौंड तांदूळ आम्ही एक रुपया आणि चौदा आण्यांना विकत घ्यायचो. अशा विकत घेतलेल्या पुड्यांसह आम्ही प्रवास करायचो. माहीम स्टेशनवर उतरायचो आणि खाडीच्या रस्त्याने, मामा राहायचे त्या कल्याणवाडीत पायी पोचायचो. हाच तांदूळ तिथे आम्ही 10 रुपयाला एक पौंड या भावाने विकायचो.''

शमसुद्दीनचे मामा धारावीत 1954-55 पर्यंत राहिले आणि नंतर त्यांच्या गावी परत गेले. त्यांच्या तिन्ही मुलांनी पाकिस्तानात जाऊन राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे तांदुळाचा व्यापार संपुष्टात आला. शमसुद्दीनकडे तर पैसेही नव्हते आणि कामही नव्हतं. एका स्थानिक कोळशाच्या कंपनीत अखेर त्याला दीड रुपये रोजानं काम मिळालं. दोन वर्षांनंतर जेव्हा मदनपुरा भागातल्या ॲटलस छपाईखान्यात त्याला नोकरी

मिळाली तेव्हा त्याची परिस्थिती किंचित सुधारली. या ठिकाणचा दरमहा पगार होता रु. 56/-. आता संसार उभारू शकू हा आत्मविश्वास आल्यामुळे 1959 साली शमसुद्दीनने हयतवी बरोबर लग्न केलं. तामिळनाडूल्या तंबराम गावची हयतवी कधीच शाळेत गेली नव्हती तर शमसुद्दीन मात्र सहावीपर्यंत तमिळ भाषेतून शिकला होता.

बांद्र्यातल्या एका बेकायदेशीर झोपडीत राहून हे जोडपं, शमसुद्दीनला मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशात संसाराचा गाडा कसाबसा पुढे रेटत होतं. वांद्र्याच्या झोपडीत त्यांच्या गावाकडचं कुणीतरी आधीच येऊन स्थिरस्थावर झालेलं होतं. या जागेत वीजही नव्हती आणि पाणीही नव्हतं. नंतर या दोघांनी, धारावीतल्या कल्याणवाडीत जिथे पूर्वी शमसुद्दीनचे मामा राहायचे त्या जागेत आपला मुक्काम हलवला. आजूबाजूला तामिळनाडूतून आलेल्या थेवर समाजातल्या30 लोकांची वस्ती होती आणि मुस्लिम म्हणावं असं फक्त याचंच घर. पण शमसुद्दीन यांना आठवतं त्यानुसार तेव्हा काही समस्याच नव्हती.

1961 साली शमसुद्दीन कुट्टीवाडी येथे राहायला गेले. ही काहीशी स्थिरावलेली चाळ होती. 10 × 18 फुटांच्या एका खोलीसाठी ते दरमहा 475/- रुपये भाडं द्यायचे. त्या काळी भरपूर पाणी होतं हे देखील त्यांना आठवतं. महानगरपालिका चाळ चांगली स्वच्छ ठेवायची. गायी गुरांसाठी एक वेगळा नळंही होता. 1887 मध्ये बडी मशीद बांधलेल्या, केरळातल्या हसन कुट्टी याचं नाव चाळीला दिलं होतं.

''तिरुनेलवेल्लीहून आलेल्या हमीद नावाच्या एका इसमाला चिक्की बनविण्याची कला अवगत होती'' शमसुद्दीन सांगतात. ''एकदा हमीद माझ्याकडे आला आणि म्हणाला, ''मला जागा द्या. मी चिक्की बनवतो.'' मग आम्ही त्याला एक झोपडं दिलं आणि तिथे तो म्हैसूरपाक आणि चिक्की बनवायला लागला. ही मिठाई मी दुकानात नेऊन विकत असे. या प्रकारच्या कामात मी दिवसाकाठी 25/- रुपयांचा नफा मिळवू लागल्यामुळे लवकरच मी छापखान्याखाली नोकरी सोडली.''

दरम्यान शमसुद्दीन आणि त्यांच्या बायकोनेही चिक्की कशी बनवायची हे शिकून घेतलं होतं. त्यामुळे जेव्हा हमीद मुंबई सोडून कलकत्याला गेला, तेव्हा या दोघांनी हाच व्यवसाय ताब्यात घेतला. दिवसभर ते चिक्की बनवायचे. वर्तमानपत्रात गुंडाळलेली चिक्की, शमसुद्दीन दररोज संध्याकाळी सिनेमागृहांच्या कॅन्टीनमध्ये विकायला न्यायचे. त्यांना घरी परतायला रात्रीचे 11 वाजायचे.

कलकत्त्यात ए-वन या नावाचं एक च्युईगम बनायचं. शमसुद्दीन यांनी देखील हेच नाव त्यांच्या चिक्कीला दिलं होतं. 1992-93 च्या दंगलीपर्यंत शमसुद्दीन यांचा धंदा चांगला भरभराटीला आला होता. दंगलीच्या काळात त्यांचे सर्व कामगार पळून गेले. त्यानंतर मात्र माझं धंद्यातलं लक्षच उडालं आणि माझ्याकडेच काम करणाऱ्या एका मुलाकडे मी तो सोपवला. आता सर्व धंदा तो चालवतो आणि दर महिन्याला नफ्यातला काही हिस्सा मला देतो.'' शमसुद्दीन म्हणाले.

धारावी क्रॉस रोडच्या बाजूला असलेल्या कुट्टीवाडीतील अबू वक्र चाळीमध्ये आजही ए-वन चिक्की उद्योग सुरू आहे. पोटगाळे असलेल्या दोन पक्क्या बांधकामाच्या खोल्यांत हा उद्योग चालतो. या अंधाऱ्या दोन खोल्यात 20 कामगार काम करतात. ज्या खोलीत काम करतात त्याच खोलीच्या माळ्यावर ते झोपतात. सर्वजण तिरुनेलवेल्ली जिल्ह्यातून आलेले आहेत. आणि बहुतेकांना फक्त तामिळ बोलता येतं. एका खोलीत म्हैसूरपाक बनवण्याचं काम चालतं तर दुसऱ्या खोलीत मसाला डाळ तळली जात असते. रे रस्त्यावरील लाकूड बाजारातून आणलेला लाकडाचा भुस्सा चुलीमध्ये इंधन म्हणून वापरला जातो. चुलीतून बाहेर पडणाऱ्या धुरानं दोन्ही खोल्या काळ्याकुट्ट झाल्या आहेत.

धारावीतल्या नागरी अपार्टमेंट्समधील एका उंच इमारतीत आता शमसुद्दीन राहतात. गुळगुळीत फरशी असलेल्या त्यांच्या दिवाणखान्यात दोन फोन, टीव्ही सेट ठेवलेलं लाकडी कपाट, काचेच्या कपाटात ठेवलेल्या बऱ्याच शोभेच्या वस्तू अशा मध्यमवर्गीय राहणीमानाच्या खुणा

दर्शवणाऱ्या विविध गोष्टी नजरेस पडतात. पांढरा शर्ट, लुंगी, लेसची पांढरी टोपी घातलेल्या 70 वर्षीय शमसुद्दीन याचं व्यक्तीमत्त्व मोठं भारदस्त आहे. लख्ख तमिळ वळणाचं हिंदी ते बोलतात. ते हजच्या यात्रेला जाऊन आलेले आहेत आणि ते हाजीसाहेब - हाजी पी.एस.शमसुद्दीन म्हणूनच ओळखले जातात. त्यांचे मुलगे शिकलेले आहेत आणि त्यांचे स्वत:चे स्वतंत्र व्यवसाय आहेत. धारावीच्या मुख्य रस्त्यावर एकाचं औषधांचं दुकान आहे.

हाजी शमसुद्दीन यांची कहाणी काही जगावेगळी नाही. खरं तर धारावी म्हणजे अशा शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तींच्या कहाण्याचं आगर आहे. या व्यक्तींना कसं काय हे साध्य झालं? त्यांचे धाडस आणि मेहनत? की, थोडासा नशिबानं दिलेला हात? की जिवंत राहण्यासाठी धडपडण्याची गरज आणि कुठलंच सुरक्षा-छत्र नसल्यामुळे अशक्यातली अशक्य गोष्ट करून बघायची अनिवार्यता?

### धाडस आणि कल्पकता

धारावीत राहणाऱ्या लोकांच्या आयुष्यात शमसुद्दीन यांची जीवनकथा पुन्हापुन्हा गिरवली जाते. कुठल्याही प्रकारची अनुदानं आणि कल्याणकारी योजना नसतानाही केवळ धाडस आणि कल्पकतेच्या जोरावर तगून राहण्याची ही एक कहाणी आहे. ज्या जागेत अनेक गोष्टी, सूटकेसपासून चामड्याच्या वस्तू, मिठाई, पापड आणि सोन्याच्या दागिन्यांपर्यंत वैविध्यपूर्ण उत्पादने बनतात त्या जागेला 'झोपडपट्टी' म्हणणं किती तोकडं आहे हे सिद्ध करणारे हे एक उदाहरण आहे.

धारावीत पावलोपावली काही ना काही उत्पादनशील कामं चालतात. धाडस म्हणजे काय याचे असंख्य चालतेबोलते नमूने या ठिकाणी भेटतात. येथील व्यवहार कुठल्याही कायद्यानं आटोक्यात ठेवता येतील अथवा कुठल्याही कायद्यानं त्यावर नियंत्रण ठेवता येईल. अशी ही जागाच नव्हे. साहसाचा वारा प्यायलेलं हे एक बेट आहे. धारावी आपला बेकायदेशीरपणा जणू मिरवते. बालकामगार, कामाची धोकादायक परिस्थिती, भेसळ, पुनर्मुल्यवृद्धी (रिसायकलिंग) टूथपेस्टपासून ते शीतपेयांपर्यंत सर्व लोकप्रिय उत्पादनांचे अनधिकृत उत्पादन सर्व काही धारावीत पाहायला मिळतं. कुठलीच गोष्ट इथे लपवून केली जात नाही. कारण अशा बेकायदेशीर धंद्यांना कधीही प्रतिबंध केला जाणार नाही. याची लोकांना जवळजवळ खात्री असते. एकंदरीतच सध्याच्या कायदा व्यवस्थेचे झापडबंद स्वरूप लक्षात घेता, धारावी म्हणजे शासनाची अनधिकृत मान्यता लाभलेली आणि असंख्य गैर व बेकायदा कृत्यांची जणू मरुभूमी बनली आहे.

सुट्टीच्या दिवशीही धारावीतलं वातावरण यंत्राच्या पट्ट्यावर काम करण्यासारखंच असतं. प्रत्येकजण काही ना काही कामात दंग असतो. निवांतपणे इकडेतिकडे बसणारे कमीच दिसतात. गल्ली-बोळातले रस्ते फेरीवाल्यांनी गजबजलेले असतात. पिन, टाचणी, फळे आणि सूटकेसपर्यंत सर्व काही विकलं जातं. फेरीवाल्यांच्या मागे, तऱ्हेतऱ्हेची दुकाने बसलेली दिसतात. सत्कार ज्वेलर्स, रेशनचं दुकान, भूपेंद्र स्टील, हुसेन हॉटेल, स्वस्तिक इलेक्ट्रिक अँड हार्डवेअर, श्रीनाथ ज्वेलर्स आणि मुंबई पॉलिक्लिनिक - 90 फुटू रस्त्यावरच्या दुकानांची ही प्रातिनिधिक सरमिसळ, हिंदू, मुस्लिम, दक्षिणेकडचे, उत्तरेकडचे अन्नपदार्थ, दागिने, हार्डवेअर, आरोग्याची काळजी घेणारी उत्पादने... सर्व एकाच रस्त्यावर.

सर्वोत्कृष्ट गुलाबजाम खायचे असोत किंवा चिक्की विकत घ्यायची असो, निर्यातीच्या दर्जाची चामड्याची हँडबॅग घ्यायची असो, वा शस्त्रक्रियेसाठी अगदी जागतिक आरोग्य संघटनेनं मान्यता दिलेला शस्त्रक्रियेत वापरला जाणारा धागा घ्यायचा असो किंवा निर्यातीसाठी बनवले जाणारे नव्या डिझाईनचे कपडे बघायचे असोत, नवी सुटकेस घ्यायची असो, वा जुनी दुरुस्त करायची असो, उत्तरेकडचे किंवा दक्षिणी अन्न चाखायचं असो, किंवा दाक्षिणात्य घाटाचे सोन्याचे दागिने पहायचे असोत... या सगळ्यांसाठी आख्ख्या मुंबईत धारावीसारखी दुसरी जागा नाही. धारावीतल्या मुख्य रस्त्यांच्या चौकातल्या दुकानात किंवा रस्त्यावर यातल्या

बऱ्याचशा वस्तू तुम्हाला पहायला मिळतील. पण अगदी गल्लीबोळात दडून असलेल्या दुकानांतही बऱ्याच काही दुर्मिळ गोष्टी पहायला मिळतील. पण यासाठी वाटाड्या मात्र धारावीचा अस्सल रहिवासी पाहिजे.

धारावीत दररोज होणारी उलाढाल किती याबाबतचे अंदाज वर्तवणे म्हणजे अंधारात घनदाट जंगलात बाण मारण्यासारखे आहे. कारण याबाबतचे उत्पन्नाचे खरे आकडे कुणी सांगत नाहीत. कारण त्यांच्या मनात सदैव भीती असते की कुणी शासकीय अधिकारी त्यांच्यावर येऊन छापा घालेल. इथे चालणारे बहुतांश उत्पादन बेकायदेशीर आहे. पण तरीही उलाढाल कोट्यवधी रुपयांमध्ये चालते एवढं नक्की. धारावीत रहाणाऱ्या काहींनी अगदी बसल्याबसल्या कागदाच्या कपट्यावर केलेल्या आकडेमोडीवरून दिसतं की धारावीची वार्षिक उलाढाल 1500 आणि 2000 कोटी रुपये सहज असू शकेल आणि दिवसाची कमीत कमी पाच कोटी रुपये तर नक्कीच आहे. प्रतिवर्षी प्रती हेक्टर उलाढाल 11 कोटी रुपये! ती सुद्धा इथल्या जागेचे भाव जमेला न धरता. उगीच नाही लोक धारावीला 'सोन्याची खाण' म्हणत.

आपण धारावीच्या गल्लीबोळातून फिरताना सहजगत्या जे बघतो त्याच सगळ्या गोष्टी 1986 साली एन.एस.डी.एफ.ने (नॅशनल स्लम ड्वेलर्स फेडरेशन) केलेल्या सर्वेक्षणात नमूद केलेल्या आहेत. त्यावेळी धारावीत छोट्या व मोठ्या आकाराचे निरनिराळे एकूण 1044 कारखाने होते. नंतर सोसायटी फॉर ह्यूमन अँड एनव्हायरमेंटल डेव्हलपमेंटने केलेल्या सर्वेक्षणात 1700 कारखान्यांची नोंद आहे. खरा आकडा नक्कीच यापेक्षा मोठा असणार. कारण काही ठिकाणी उत्पादन राहत्या घरांत. पोटमाळ्यांवरही चालते. हे छोटे उद्योग/कारखाने सर्वेक्षणात धरले गेले नसणार.

एन.एस.डी.एफ.च्या सर्वेक्षणानुसार पाच ते दहा जणांना कामावर ठेवणारे 244 लघु-उद्योजक धारावीत होते. सर्वेक्षणात नोंद केलेले 43 मोठे कारखाने, प्रत्यक्षात मध्यम आकाराचे कारखाने असणार. यामध्ये शस्त्रक्रियेमसाठी लागणारा धागा बनवणारे दोन कारखाने आहेत. यातील एक आंतरराष्ट्रीय कंपनी आहे, 'डुप्लिकेट कोलगेट' टूथपेस्ट बनवणारा कारखाना आहे. (सर्व गोष्टींची डुप्लिकेट किंवा नक्कल हे धारावीचं वैशिष्ट्य आहे.) शिवाय साबण, मिठाई बनवणारे उद्योग आहेत. 1980 पर्यंच चामडी कमावण्याचे सर्व कारखाने धारावीच्या बाहेर पडून देवनारला जातील असं जरी कागदोपत्री असलं तरी प्रत्यक्षात काही कारखाने अद्यापही धारावीतच आहेत.

एन.एस.डी.एफ. सर्वेक्षणानं चिक्की, पापड, चण्याची डाळ असे विविध प्रकारचे अन्नपदार्थ बनवणाऱ्या 152 लघुउद्योगांची नोंद केली. शिवाय 50 छापखाने, 111 उपहारगृहे, 722 भंगार आणि पुनर्-मूल्यवृद्धी/पुनर्निर्मिती करणारे उद्योग केवळ निर्यात निर्मितीसाठी काम करणारे 85 उद्योग आणि 25 बेकऱ्या यामध्ये समाविष्ट आहेत. हे सर्व उद्योग धारावीभर पसरलेले असून तात्पुरत्या वसाहतीमध्ये ते संख्येने अधिक आहेत.

लहान/मोठ्या अशा या सर्व उद्योगाचे वैशिष्ट्य म्हणजे शासन असूनही ते उभारले गेले आहेत. शासनामुळे ते वर आलेले नाहीत, हे लक्षात घेण्यासारखं आहे. छोट्या आणि मध्यम आकाराच्या कारखान्यांना शासन देत असलेले फायदे यातल्या काहींना मिळत असतील. पण कारखान्यांसाठी म्हणून जे काही नियम आहेत त्या नियमांचं पालन या उद्योजकांपैकी बहुतेक जण करत नाहीत. परस्परांना फायद्याची अशी ही परिस्थिती आहे. एक तर इतकी विविधता असलेल्या उद्योगक्षेत्रावर देखरेख करण्याचं आणि कर आकारण्याचं काम शासनाला करावं लागत नाही. दुसरीकडे सर्व नियम, अगदी कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेबाबतचेही नियम धाब्यावर बसवून या वैविध्यपूर्ण औद्योगिक क्षेत्राला स्वत:ची भरभराट करून घेते येते. कामगारांकडे आरोग्य-विमा नसणं, कामावरून कमी केलं जाणं, अधिक स्वस्त वेतनात काम करणाऱ्या कामगारांमुळे जुन्या कामगारांच्या बदली नवीन कामगार घेणं या गोष्टी सर्रास चालू असतात. पण याबाबत

शासन, उद्योजक आणि कामगारदेखील काही तक्रार करत नाहीत, कारण अशा परिस्थितीत एका वेगळ्या पद्धतीनं प्रत्येकाचाच फायदा होत असतो.

धारावीमध्ये चालणाऱ्या उद्योगाचं वैविध्य शब्दात पकडणं अशक्य आहे. ढोबळ मानाने या उद्योगांचे दोन भाग पाडता येतील. पहिला आहे पारंपरिक व्यवसायाचा आणि दुसरा आधुनिक उद्योगांचा. या दुसऱ्या गटात चर्मोद्योग - कातडी कमावणे, त्यावर प्रक्रिया करणे, चामड्यांच्या वस्तू बनवणे, शस्त्रक्रियेसाठी लागणारे धागे, चामड्याचे पट्टे/बक्कल वगैरेंचे उत्पादन आणि तयार कापडे बनवण्याचा व्यवसाय आदीआहेत. बहुसंख्य तयार कपडे स्थानिक बाजारपेठेच विकले जातात. यानंतर याच गटात वेगवेगळे अन्नपदार्थ, मिठाई, पापड आणि बेकरीतील विविध बिस्किटे बनवण्याचा व्यवसायही समाविष्ट आहेत, उदा. भंगारातून पुनर्-मूल्यवृद्धी, फाऊंड्रीमध्ये तयार होणाऱ्या पितळेची बकले. पारंपरिक व्यवसायामध्ये कुंभार, दागिने बनविणारे कारागीर आणि सोनार या व्यावसायिकांचा समावेश आहे.

### चर्मोद्योग

धारावीमधले चामडी कमावण्याचे सर्व उद्योग/कारखाने, अधिकृतरित्या खरंतर, देवनारला हलवले आहेत. पूर्वी जेव्हा हे उद्योग धारावीमध्ये कुठेकुठे होते तेव्हा धारावीमध्ये शिरल्याबरोबरच एक विशिष्ट दर्प तुमच्यावर येऊन कोसळायचा. 1950 आणि 1960 या दरम्यान धारावी कशी होती असं कुणालाही विचारले तर ते सांगतील की धारावी म्हणजे दुर्गंधी. चामडी स्वच्छ केल्यानंतर लोकरीच्या तुसांनी वस्तीतले काही भाग संपूर्णपणे आच्छादले जायचे. आजही स्वच्छ केलेली शेळ्या-मेंढ्यांची कातडी उन्हात वाळत टाकलेली दिसतील आणि लोकरीच्या तुसांचा गालिचा पसरलेल्या गल्लाही धारावीमध्ये दिसून येतील. हलक्यातील हलकी तुसं बुटक्या घरांच्या छपरांवर आणि त्यांच्या पलीकडे पसरवण्यासाठी, वाऱ्याची हलकीशी झुळूकही पुरेशी आहे.

धारावीतल्या 39 चामडे कमावण्याच्या उद्योगांपैकी 27 उद्योगांना देवनारमध्ये पर्यायी जागा देण्यात आली असली तरीही मोठे जेवढे उद्योग होते तेवढेच धारावीतून हलले. अधिकृत बंदी असूनही काही छोट्या, जुन्या उद्योगांनी अजूनही वस्तीच्या आत, खबदाडात काम चालूच ठेवलं आहे. बहुसंख्य तमिळ असलेल्या पालवाडीत गेलात तर आजही काही टपऱ्या हमखास आढळतील. आंतरराष्ट्रीय कंपनीत पूर्वी नोकरदार असणाऱ्या एका माणसानं कपड्याच्या साबण बनवण्याचा उद्योग टपरीच्या एका बाजूला सुरू केलेला दिसेल. ज्या ठिकाणी तो पूर्वी काम करायचा तिथे बनवला जाणारा साबण आणि आता तो स्वत: उत्पादित करत असलेल्या साबणात विलक्षण सारखेपणा आहे. टपरीच्या दुसऱ्या टोकाला जो उद्योग चालतो त्यावरून कल्पना येईल की पूर्वी धारावीत चामडे कमावण्याची प्रक्रिया कशी चालायची. तिथे संपूर्ण टपरी व्यापून उरणारे प्रचंड आकाराचे एक लाकडी पिंप आहे. एखाद्या अवाढव्य प्राणी हालचाल करताना ज्याप्रकारे स्वत:ला एकदम थांबवू शकत नाही त्याप्रमाणे हे पिंप गुंगी येईल अशा सुरात करकरत असतं. पिंपाच्या आत अनेक कातडी एका रासायनिक द्रावणामध्ये खळबळली जातात. कातड्यांवर प्रक्रिया करण्यामधला हा जवळजवळ शेवटचा टप्पा आहे.

पूर्वीच्या काळी या चामडे कमावण्याच्या उद्योगात जे लोक काम करायचे ते कामगार तिथेच राहायचे. काम अतिशय घाणीचे होते आणि सर्वात खालच्या जातीतले पुरुषच या कामासाठी घेतले जायचे. कत्तलखान्यातली रक्ताळलेली कातडी इथे रात्री पोहोचायची. सर्वात प्रथम ही कातडी धुण्याचं काम असे. पुढचा टप्पा ती खारवण्याचा. म्हणजे त्यांना मीठ (सोडियम सल्फाईड) लावून चार तास ती ठेवून द्यायची. यानंतर पुन्हा एकदा या कातड्यांना मीठ लावून ठेवलं जायचं. कातडी कमावण्याचे काम करणाऱ्या कारखान्यात मग ही कातडी पाठवली जायची.

काही ठिकाणी या कातड्यांवर आणखी प्रक्रिया केली जायची. चुन्याच्या रांजणात किंवा पिंपामध्ये ही कातडी

चार दिवस बुडवून ठेवली जायची. नंतर लावली जाणारी रसायने शोषली जावी यासाठी त्या कातड्यांची ही पूर्वतयारी. यानंतर त्या कातडीवरील लोकर, उरलेलं मांस आणि चरबी खरडून काढून टाकली जायची पूर्वी हे काम हातांनी केलं जायचं. आता मशीनच्या साहाय्यानं केलं जातं. चुन्याचा प्रभाव कमी करण्यासाठी नंतर ही कातडी अमोनिअम क्लोराईडमध्ये बुडवून ठेवली जातात. यामुळे लेदर फिक्सिंग होऊन कातडीवरचे शेवटचे उरलेसुरले केसही निघून जातात. या टप्प्यावर कातडी जवळजवळ पांढऱ्या रंगाची तयार होतात.

यानंतर चामड्यावर रासायनिक क्रिया केली जाते. क्रोमियम सल्फेटने चामड्यावर आठ तासांपेक्षा अधिक वेळ प्रक्रिया केली जाते. यानंतर एक दिवस मध्ये थांबून, मऊपणा येण्यासाठी चामड्यावर फॅटलिकर लावलं जातं. हे केल्यानंतरच चामडं वाळवलं जातं आणि शेवटच्या टप्प्यात त्याला रंग दिला जातो.

कातडी कमावण्याचे बहुतेक उद्योग धारावीच्या बाहेर हलल्यामुळे एकूण प्रक्रियेतील सुरुवातीच्या एक-दोन टप्प्यांचेच काम तिथे केलं जातं. निम्मी प्रक्रिया झालेली कातडी जहाजानं चेन्नईला पुढच्या कामांसाठी पाठवली जातात. प्रक्रिया होऊन आलेले चामडे परत धारावीत येते तिथे त्यापासून तयार वस्तू बनवल्या जातात.

चामडे बनवण्याच्या प्रक्रियेतला जो पहिला टप्पा आहे तो सर्वात वाईट आहे. धारावी मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या कुट्टीवाडीत जर तुम्ही गेलात तर इनायतभाईच्या गोदामामध्ये सोडियम सल्फाईड वापरून कातड्यांवर प्रक्रिया करण्याचे काम सुरू असलेलं तुम्हाला दिसेल. इथे येणारा वास तुम्हाला गुदमरवून टाकण्यास पुरेसा आहे. कदाचित खूप वर्ष तिथेच घालवल्यानंतर इथे वावरणाऱ्या लोकांना या वासाची सवय होत असावी. आता इनायतभाईंनाच पहा ना. कातडीला मीठ वगैरे लावण्याचं काम त्यांचे कामगार करत असताना ते शांतपणे बसून सर्वांवर देखरेख करत असतात.

यांच्या मतानुसार एक लाख प्रत्येक आठवड्याला (मंगळवारी आणि शनिवारी) देवनारला 40,000 शेळ्याची कत्तल होत असावी. मध्यप्रदेश आणि गुजराथमधून या प्राण्यांना मुंबईत आणलं जातं. कत्तल झालेल्या प्राण्यांची ही सरकारी, अधिकृत आकडेवारी आहे. पण आणखी5000 प्राणी मारले जात असावेत असा अंदाज आहे. प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यातील कामासाठी ही सर्व कातडी धारावीत आणली जातात. प्रत्येकी 100 रुपयांना एक या दराप्रमाणे कातडे विकत घेतलं जातं आणि खारवून झाल्यानंतर थोड्या अधिक किंमतीला विकलं जातं. यांच्या म्हणण्यानुसार एक लाख यामध्ये नफ्याचं प्रमाण अत्यल्प असतं. शेळ्यांव्यतिरिक्त कत्तलखान्यात दर आठवड्याला 500 म्हशी आणि 200 गायीही मारल्या जातात. हे कातडे प्रत्येकी 500 रुपयांना विकले जाते.

चामड्याच्या उद्योगातले बहुसंख्य एकतर उत्तर प्रदेशातले मुस्लिम आहेत किंवा तिरुनेलवेल्लीमधील मुस्लिम आणि हिंदू आहेत. याला अपवाद दाराब पेडर यांचा. सौम्य, प्रसन्न चेहऱ्याचे, चष्मा घालणारे 67 वर्षाचे हे पारशी गृहस्थ, तिथे 'वाट चुकलेले फकीर' वाटण्याची शक्यता अधिक. इंग्रजीपेक्षाही ते हिंदी बोलणं अधिक पसंत करतात. ''माझ्या वडिलांनी मला या आयुष्यात आणलं. आपल्या आईवडिलांच्या मळलेल्या वाटांवरूनच आपल्याला चालावं लागतं. काय करणार?''

डोळ्यात चमक असलेले पेडर खास नाटकी ढंगानं विचारतात. पहिल्या जागतिक महायुद्धापूर्वी जेव्हा दारबचे आजोबा एका जर्मन कंपनीत काम करण्यासाठी एडनला गेले तेव्हापासून या कुटुंबाचे धागेदोरे चामड्याच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. आफ्रिकेतून कातडी विकत घेऊन प्रक्रियेचा पहिला टप्पा इथे उरकून मग ते ही कातडी जर्मनीला कमावण्याच्या कामासाठी आणि अंतिम प्रक्रिया करण्यासाठी पाठवत असत.

1930 साली पेडर यांचे वडील भारतात परत आले आणि धारावीतल्या चामडे कमावणाऱ्या उद्योजकाकडे त्यांना

काम मिळालं. 1957 पर्यंत त्यांनी तिथे काम केलं आणि मग ते निवृत्त झाले. वर्षानंतर ते वारले. निवृत्तीनंतर त्यांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला होता. वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे दारब पेडर यांना कॉलेजचं शिक्षण अर्धवट सोडून धंद्याकडे लक्ष द्यावं लागलं. भारतातल्या चर्मोद्योगातले सर्वात मोठे उद्योजक नागप्पा चेट्टियार यांच्याबरोबर त्यांनी 1978 पर्यंत काम केलं. भारतभर पसरलेल्या 200 विक्री केंद्रातून येणाऱ्या 50,000 कातड्यांवर चेट्टियार उद्योगात दररोज प्रक्रिया केली जाते. पश्चिम भागातल्या 14 विक्री केंद्राचा पुरवठा पेडर बघत असत.

1978 साली पेडर यांनी चेट्टियार यांच्याबरोबरचं काम थांबवून वीरा टॅनरीज या नावानं स्वत:चा उद्योग सुरू केला. चामडे कमावण्याचा उद्योग करण्यासाठी धारावीत किंवा मुंबईत जागा नसल्यामुळे पेडर यांनी औरंगाबाद येथे औद्योगिक क्षेत्रात 65 एकरांची जागा घेतली.

देवनार येथील कत्तलखान्यातून येणाऱ्या कातड्यांवरची प्रक्रिया पेडर यांच्या धारावी येथील कत्तलखान्यात होते. खारवलेली कातडी पुढील टप्प्यावरच्या कामासाठी औरंगाबाद येथे पाठवली जातात. दररोज 1000 ते 1200 चामडी कमावण्याचे काम पेडर यांच्या केंद्रात होते.

पेडर यांच्या अंदाजानुसार धारावी येथील प्राथमिक चामडे कमावण्याच्या उद्योगातली उलाढाल प्रतिवर्षी 60 कोटी रुपये आहे. यापैकी शेळ्या आणि मेंढ्यांच्या कातड्यांवरची उलाढाल 50 कोटी रुपयांच्या पुढे आहे आणि उरलेली रक्कम गाई-म्हशींच्या कातड्यांच्या उद्योगातली आहे असं त्यांचे म्हणणं आहे.

चामडे कमावण्याचा उद्योग धारावीत जवळपास नष्ट झालेला असला तरी त्याची जागा आता चामड्याच्या तयार वस्तू बनवण्याच्या उद्योगाने घेतली आहे. धारावीतल्या 90 फुटी रस्त्याच्या शेवटी येऊन जसे तुम्ही सायन-माहीम जोडरस्त्याकडे जाण्यासाठी वळता तसे तुम्हाला जॅझ, लेजरक्राफ्ट, स्टेप-इन, आयडियल लेदर अशी नावं धारण केलेली झगमगीत, दुकाने रस्त्याच्या दोन्ही बाजूला दिसतील. चकचकीत काचांच्या मागे लेदर हँडबॅगा, सुटकेस आणि ब्रीफकेसमधील सर्वात नूतनतम डिझाईन्स तसेच वॉलेट, बेल्ट, फोटोफ्रेम्स आणि चामड्याच्या इतर असंख्य वस्तू तुम्हाला तिथे पाहायला मिळतील. धारावीतल्या अनेक उद्योजकांच्या निर्यात करण्याच्या चामड्याच्या वस्तूंपैकी नाकारलेला वा जास्त झालेला माल इथे विकायला ठेवलेला असतो. दक्षिण मुंबईत या वस्तूंसाठी तुम्ही जी किंमत मोजाल त्यापेक्षा निम्म्या किंमतीला तुम्हाला या वस्तू इथे उपलब्ध होतात. वस्तूच्या भावाबद्दल घासाघीस करणं हा इथला नियमच. सगळेच अगदी कमी नफ्यावर काम करतात आणि कोणतीही वस्तू कमी किंमतीत विकायला तयार असतात.

मुंबई शहरातल्या श्रीमंतांनाही आता माहीत झालेला हाच तो धारावीमधला प्रसिद्ध लेदर स्ट्रीट. चामड्यापासून वस्तू बनवण्यासाठी उच्च दर्जाचं चामडे आवश्यक असतं. पण धारावीत कमावलेलं चामडे सर्वसाधारणत: इतक्या उच्च दर्जाचं नसतं. यासाठी प्रक्रिया केलेलं चामडे चेन्नईहून बोटीनं येतं. चामडे कमावण्याचे बहुसंख्य उद्योग आता चेन्नईमध्ये आहेत.

चामड्याच्या तयार वस्तूंच्या नशिबी जरी वातानुकूलित दुकानं असली तरी त्या वस्तू घडवणाऱ्या माणसांना अशा कोणत्याच सुखसोयी मिळत नाहीत. पोटमाळ्यांवर अडचणीत, अपुऱ्या उजेडात, कोंदट जागी मरणाऱ्या उकाड्यात बसून हे कामगार चामड्याच्या सुंदर, सुबक वस्तू बनवत असतात.

सिद्धान्त लेदर वर्क्स हे चामड्याच्या तयार वस्तूंचे धारावीतले सर्वात जुने दुकान. या सर्व झगझगीत शो-रुम्सच्या मागच्या गल्लीत, पटकन लक्षातही येणार नाही अशा ठिकाणी हे दुकान आहे. दुकानाचा मालक मनीष माने एका चिंचोळ्या खोलीत बसलेला असते. मनीषचे आजोबा शंकर माने यांनी हा व्यवसाय सुरू केला. 1933 साली सोलापूर - सातारा जिल्ह्यांच्या हद्दीजवळच्या भागातून शंकर माने मुंबईत कामाच्या शोधार्थ आले. शंकर माने यांनी त्यांच्या गावात त्यांच्या वडिलांसारखेच चामड्यावर काम केलं होतं. त्यामुळे

चामड्याच्या वस्तू बनवणाऱ्या त्या काळी अस्तित्त्वात असलेल्या एकमेव कारखान्यात, प्रिन्सेस स्ट्रीटवरच्या युनिव्हर्सल ट्रेडिंग कंपनीमध्ये लेदर बॅग्ज तयार करण्याचं काम त्यांना सहजच मिळालं. त्यावेळी त्यांना महिन्याला रु. 20/- पगार होता.

मुंबईमध्ये 1942 साली जेव्हा हिंदू मुस्लिमांमध्ये दंगली उसळल्या तेव्हा शंकर माने परत त्यांच्या गावी गेले. दोन्ही समाजामध्ये संपूर्णपणे शांतता प्रस्थापित झाल्यानंतरच म्हणजे 1946 साली ते परत आले. त्यांच्या सुदैवानं युनिव्हर्सल ट्रेडिंग कंपनीनं माने यांना त्यांच्या स्वत:चा कारखाना सुरू करायला मदत करण्याचं ठरवलं. 1951 साली माने यांनी धारावीच्या पारशी चाळीत 36 फूट × 12 फुटांची जागा 1800/- रुपयांना घेतली आणि सिद्धान्त लेदर वर्क्सची मुहूर्तमेढ रोवली. आज मनीष आणि त्याचे 55 वर्षांचे वडील - शिवराम शंकर माने याच खोलीतून त्यांचा व्यवसाय चालवतात.

पण आता सभोवतालची परिस्थिती खूप बदललेली आहे. जागा पारशी गृहस्थाच्या मालकीची असल्यामुळे या चाळीला पारशी चाळ म्हणत. अगदी सुरुवातीला या जागी गायी, म्हशी आणि घोड्यांचे तबेले होते. इंग्रज गेल्यानंतर या तबेल्याचे चाळीत रुपांतर करण्यात आले. पोटमाळा, कौलारू छप्पर असलेल्या खोल्या. चाळीतल्या बऱ्याचशा पूर्वीच्या खोल्या आजही उभ्या आहेत. 1955 साली शिवराम यांनी त्यांच्या खोलीची डागडुजी करून त्यामध्ये सुधारणा केली आणि त्या काळी महानगरपालिकेनं दिलेलं संमतीपत्र वगैरे कागदपत्रे त्यांनी जपून ठेवली आहेत. आजही ती त्यांच्याकडे आहेत. यामध्ये काही मजेशीर सुधारणा सूचवल्या आहेत. उदा. सर्व खिडक्या सागवानी लाकडाच्या असाव्यात अशी महानगरपालिकेची सूचना आहे!

काम सुरू करण्यासाठी शिवराम यांच्या जुन्या मालकांनी त्यांना चामडे शिवण्याचं एक शिवणयंत्र दिलं होतं. थोड्या अवधीतच शिवरामनी आणखी आठ शिवणयंत्रे विकत घेतली. त्या काळी एक शिवणयंत्राची किंमत रु. 150/- ते 200/- रुपयांच्या आसपास होती. आज याच मशीनची किंमत 36,000/- पासून सुरू होऊन 80,000/- रुपयापर्यंत आहे.

शिवराम यांच्या वडिलांना शिक्षण अर्धवट सोडून मुंबईत कामाच्या शोधात यावं लागलं होतं. शिवराम यांनी मात्र अकरावीपर्यंत शिक्षण घेतलं. त्यांना दोन मुलगे आणि दोन मुली असून त्या सगळ्याचं शिक्षण व्यवस्थितपणे पूर्ण होईल याची त्यांनी व्यवस्था केली आहे.

जेव्हा शिवराम यांनी धारावीत कामाला सुरूवात केली तेव्हा त्यांच्याप्रमाणे चामड्यांचा व्यवसाय करणारे आणखी दोघेजण धारावीत होते. आज शिवराम यांच्या उद्योगापेक्षाही मोठे असे 25 ते 30 उत्पादक धारावीत आहेत आणि जॉबवर्क करणारे 5000 पेक्षा अधिक लोक आहेत. एक किंवा दोनच शिवणाची यंत्रे असलेले हे लोक मोठ्या कारखान्यांच्या जशा ऑर्डर मिळतील तसं काम घरीच करून देतात. शिवराम यांच्या अंदाजानुसार या विभागात जवळपास घरची एक-दोन माणसे या प्रकारच्या जॉबवर्कमध्ये गुंतलेली आहेत.

कारखान्यांच्या तळमजल्यावर सहा कारागीर दागिने ठेवण्याच्या चामड्याच्या पेटऱ्या बनवत असतात आणि पोटमाळ्यावर बसलेले कामगार लेदर ब्रीफकेसचे भाग बनवत असतात. आफताब हा 17 वर्षांचा तरुण बिहारच्या मधुबनी जिल्ह्यामधून आलेला आहे आणि तो लेदर ब्रीफकेसचे भाग बनवत असतो. तो सांगतो ''मी प्रथम मुंबईत आलो तेव्हा मी एका नातेवाईकांकडे रहायचो. कसं तरी मला काम मिळालं आणि मग माझ्या लक्षात आलं की हातात चार पैसे असणं किती चांगली गोष्ट आहे. त्यामुळे गावी जाऊन माझं शिक्षण पूर्ण करण्यात काही अर्थ नाही असं मी ठरवलं आहे.'' धारावीतल्या कारखान्यांमध्ये हमखासपणे आढळणाऱ्या हुषार आणि चुणचुणीत युवकांपैकी अफताब एक आहे. प्रत्येक गोष्टीवर याचं काही ठाम मत असतंच. ''लालूंना गरीबांची काळजी आहे म्हणूनच ते एवढे लोकप्रिय आहेत.'' बहुरंगी व्यक्तिमत्त्वाच्या बिहारच्या माजी मुख्यमंत्र्याबद्दल हे अफताबचं मत आहे.

शिवराम सांगतात की जेव्हा ते त्यांच्या वडिलांबरोबर

पारशी चाळीत रहायला आले तेव्हा हा संपूर्ण भाग दलदलीचा होता आणि तिथे दुकाने वसली आहेत. त्यावेळी चर्मोद्योग व्यवसायात, बूट, चपला, बनवण्याच्या कामात महाराष्ट्रातलेच लोकसंख्येनं खूप असायचे. त्यातही सातारकडचे लोक त्यात बरेच होते. आज हे काम करणाऱ्यांपैकी 60 टक्के लोक उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यातले मुस्लिम आहेत. शिवराम यांच्यासारखी जी मराठी माणसं अद्यापही या व्यवसायात टिकून आहेत ती सर्व चामड्याची पैसे ठेवण्याची छोटी पाकिटे आणि पिशव्या बनवतात. चपला, बूट बनवण्याचं पारंपरिक कौशल्य वापरून काम करणारे फार कमी जण आढळतात. वेगवेगळ्या गल्ल्यांतून अशा व्यक्तीला जरा शोधावंच लागतं.

पण दामोदर रामचंद्र कांबळे याला अपवाद आहेत. पारशी गल्लीत त्यांचे चपला, बूट बनवण्याचं दुकान आहे. जयश्री लेदर आर्ट त्यांनी 1982 मध्ये स्थापन केलं आणि परदेशातल्या एका कामासाठी, बुटांचे फक्त वरचे भाग ते बनवतात मग हे वरचे भाग कारखान्यात पाठवले जाऊन तिथे त्यांना बुटांचे तळ जोडले जातात. तयार बूट ऑस्ट्रेलिया आणि जपानमध्ये पाठवले जातात.

अख्ख्या धारावीत या प्रकारचं काम करणारे आपण एकटेच आहोत असा दामोदर कांबळे यांचा दावा आहे. 10 × 20 फुटांच्या एका खोलीत आणि धारावी 'स्टँडर्डनुसार' प्रशस्त पोटमाळा असलेल्या जागेत त्यांचे 20 कामगार काम करत असतात. काम करण्याच्या ठिकाणी दिवेही व्यवस्थित लावलेले असून इतर कारखान्यांप्रमाणे ही खोली कोंदट नाही. कांबळे यांचे कामगार उत्तर प्रदेश, बिहारसकट भारतातल्या सर्व राज्यातून आलेले आहेत.

पुणे जिल्ह्यातल्या नीरा गावचे कांबळे म्हणतात की त्यांचे आईवडिलही पादत्राणं बनवण्याच्या व्यवसायात होते. ''आमची परिस्थिती वाईट होती म्हणून आम्ही मुंबईला आलो. चामड्याच्या कारखान्यात मी 15 वर्षे कामगार म्हणून काम करत होतो. माझा स्वत:चा व्यवसाय सुरू केला तेव्हा माझ्याकडे कुणीच कामगार नव्हते. हळूहळू मी लोकांना कामावर ठेवायला सुरुवात केली. आज माझ्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल एक कोटी रुपयांच्या पुढे आहे.''

बांद्रा येथील कत्तलखान्याच्या जवळ धारावी असल्याचा अजून एक फायदा होता. आणखी एका व्यवसायाची निर्मिती यामधून झाली. - शस्त्रक्रियेमध्ये जखम शिवताना टाके घालण्याचा जो धागा असतो, त्याची निर्मिती. या व्यवसायातील आंतरराष्ट्रीय कंपनी, जॉन्सन अँड जॉन्सनचा एक कारखाना धारावीतही आहे. याखेरीज या व्यवसायात उत्तम नाव कमावलेली व्यक्ती म्हणजे आयडियल ट्रेडिंग कंपनीचे मालक अब्दुल बाका. जागतिक आरोग्य संघटनेनं त्यांच्या कारखान्यास प्रमाणपत्र दिलं आहे. धारावीत घाणीचं साम्राज्य असूनही त्यांच्या कारखान्यात मात्र काटेकोर स्वच्छता ठेवली जाऊन शस्त्रक्रियेसाठी लागणारा उच्चतम गुणवत्तेचा धागा तिथे बनवला जातो. हा धागा खास करून निर्यातच होतो असं श्री. बाका आपल्याला अतिशय अभिमानानं सांगतात.

धारावीमध्ये घडोघडी आढळणाऱ्या यशोगाथांपैकीच श्री. बाका यांची कहाणी आहे. वयाच्या 13व्या वर्षी 1948 साली आझमगढ जिल्ह्यातून ते मुंबईत आले. ते धारावीत कुणालाही ओळखत नव्हते पण त्यांना त्याचं गाव सोडावंच लागलं कारण ते दोन वर्षाचे असतानाच त्यांचे वडील वारले. जरी त्यांच्या आईनं परत लग्न केलं तरी आर्थिक परिस्थिती हालाखीचीच होती.

''मी ऐकून होतो की धारावीमध्ये आझमगढहून आलेले लोक आहेत म्हणून मी इथे आलो. तेव्हा मी बड्या मशिदीमध्ये झोपत असे. रफिक यू.पी. रेस्टॉरंटमध्ये मी दिवसभर टेबल साफ करण्याचं काम करत असे. पगार मिळायचा दर महिना 15 रुपये. मी चार वर्षे, 1952 पर्यंत तिथं काम केलं पण पैशाची काहीच बचत करू शकलो नाही. त्या काळी धारावी हा भयंकरच प्रकार होता. सगळी दलदलच होती. माहीम स्टेशनच्या बाजूनं यायचं म्हणजे आम्हाला दलदलीतून चालतच वाट काढावी लागायची.'' बाका सांगत होते.

परिस्थितीमुळे निराश होऊन बाका 1952 मध्ये

आझमगढला परत निघून गेले आणि त्यांनी रेशनचं दुकान उघडलं. 10 वर्षे हा उद्योग करून फारसं काही हातात पडलं नाही. 1962 साली पुन्हा एकदा नशीब अजमावयाला बाका मुंबईमध्ये आले पण त्यांनी त्यांच्या कुटुंबाला मात्र त्यांच्यासोबत आणलं नाही. धंदा सुरू करण्यासाठी त्यांच्याकडे काहीच पैसा नव्हता. त्यांचा एक मित्र कोईमतूरला शस्त्रक्रियेमध्ये जखम शिवायला लागणारा धागा बनवत असे त्या मित्रानं यांना या कामात येण्याचं सूचवलं. लवकरच बाका यांनी या व्यवसायावर पकड मिळवली आणि स्वतंत्रपणे हा व्यवसाय सुरू केला. जॉन्सन अँड जॉन्सन सारख्या कंपन्यांना ते तयार माल पुरवू लागले तसेच त्यांचा धागा निर्यातही होऊ लागला. तीन वर्षातच बाका यांनी चांगलं घर विकत घेण्याइतकी माया जमवली आणि ते कोईमतूरला सुखासमाधानाने राहू लागले.

श्री. बाका माल पुरवत असलेल्या इटालियन कंपनीचं कार्यालय मुंबईत होतं. या कंपनीचा मालक इटालियन ज्यू होता. त्यानं बाका यांना मुंबईत येऊन त्यांच्याबरोबर काम करण्याबद्दल विचारलं. दोघांनी भागीदारी करून काही वर्ष एकत्र काम केलं. शस्त्रक्रियेसाठी लागणारा धागा बनवून तो निर्यात केला. 1970 साली इटालियन गृहस्थ म्हणाला की त्याला इटलीत परत जायचं आहे आणि हा व्यवसाय पुढे चालू ठेवण्यामध्ये त्याला रस नाही. बाका यांनी मग त्याचाही भाग स्वत:च्या ताब्यात घेऊन 1970 साली धारावीमध्ये आयडियल ट्रेडिंग कंपनी या नावानं एक कारखाना सुरू केला.

बाका बनवत असलेले धागे चामड्याच्या व्यवसायाचे वर्तुळ पूर्ण करतात - कातडी, मग चामड्यापासून तयार केलेल्या वस्तू आणि शेवटी चामड्यापासून बनवलेला धागा. बांद्र्यामधील कत्तलखान्यामुळे यातल्या प्रत्येकाचं एक वेगळं स्थान धारावीमध्ये आहे. धारावीत आणि मुंबईसारख्या महानगरीत इतर बदल जरी भरपूर झालेले असले तरी चामडे कमावणे आणि त्यांच्याशी संबंधित इतर उद्योग हेच धारावीतले प्रमुख व्यवसाय आहेत आणि या व्यवसायांसाठीच धारावी आजही ओळखली जाते.

धारावी क्रॉस रोडच्या बाजूची गल्ली आपल्याला कुट्टीवाडीत घेऊन जाते. या गल्लीत नेहमीच चिखल आणि राडा असतो. गल्लीच्या एका बाजूला धारावीतल्या सर्वात जुन्या बेकऱ्या आहेत. तर दुसऱ्या बाजूला गोदामांची एक रांग आहे. यातलं पहिलं आहे चामड्यावर पुरातन पद्धतीनं प्रक्रिया करणारं केंद्र. या प्रकारची केंद्रे धारावीच्या अनेक गल्ल्यातही आहेत आणि त्यांच्या उघड्या दारातून येणाऱ्या भपकाऱ्यावरूनच ती सहज ओळखू येतात.

या उलट पुढच्या गोदामात तयार कपड्यांचा छोटा कारखाना आहे. तीन टेबलं ओळीनं जोडून ठेवलेली, एका बाजूला कापडांचे तागे, भिंतीवर कागदी नमूने लावून ठेवलेले, आता प्रतीक्षा फक्त मास्टर कटर्सची. दुकानाच्या एका टोकाला छोट्याशा वातानुकूलित कचेरीमध्ये कारखान्याचा मालक मुस्ताकीम बसलेला असतो. कुडता पायजमा घातलेला, चष्मा लावलेला मुस्ताकीम तरुणच आहे. त्याच्या कचेरीशेजारच्या छोट्या खोलीत संगणक ठेवलेला आहे. त्याच्या सहाय्याने तो अमेरिकेतल्या दूरवरच्या बाजारपेठांशी संपर्क ठेवून असतो. टेबलावर फोन्स आणि फॅक्स मशीन आहे आणि बाजूच्या रॅकवर अनेक तयार कपड्यांचे नमूने आहेत. मुस्ताकीम तयार कपडे अमेरिकेला निर्यात करतो ते अंतिमत: वॉल मार्ट आणि के-मार्टद्वारा तिथे विकले जातात.

1970 साली जेव्हा 13 वर्षाचा मुस्ताकीम उत्तर प्रदेशातून मुंबईत आला होता तेव्हा त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं की एक दिवस तो कपड्यांच्या कारखान्याचा मालक बनेल आणि तो कपडे थेट अमेरिकेलाच निर्यात करेल. उत्तर प्रदेशातल्या रायबरेली जिल्ह्यामध्ये मुस्ताकीमच्या कुटुंबाचा जमीनजुमला होता. नेहरू गांधी घराण्याचा मतदारसंघ म्हणून रायबरेली अधिक प्रसिद्ध आहे. कालौघात जमिनीचे विभाजन होत मुस्ताकीमचे कुटुंबीय कफल्लक झाले. मुस्ताकीमचं शालेय शिक्षण जरी अपूर्ण होतं तरी परिस्थितीच्या रेट्यामुळे कामाच्या शोधार्थ तो मुंबईत आला.

महानगरीतलं त्याचं पहिलं घर होतं कुप्रसिद्ध

कामाठीपुऱ्यात - मुंबईची रेड-लाईट एरिया. तिथे राहणाऱ्या एका नातेवाईकानं मुस्ताकीमला त्याच्या घरात आसरा दिला. तयार कपडे बनवणाऱ्या एका कारखान्यात मुस्ताकीमला बिनपगारी काम मिळालं. हा व्यवसाय शिकण्याची संधी मात्र त्याला होती. दररोज सकाळी 7.30 वाजता कारखान्यात तो जाई, जागेची झाडलोट, मशीन्सची सफाई, कामगारांना चहा देणे अशी सर्व कामे तो करी. मग सर्वजण कामं करून गेल्यानंतर तो शिवणयंत्राला हात लावू शके आणि हळूहळू स्वतःच माहिती करून घेत तो शिवायला शिकला. तिथले सर्व कामगार उत्तर प्रदेशातलेच होते आणि कुणाचीच मुंबईत राहायची सोय नसल्यामुळे ते कारखान्याबाहेरच्या रस्त्यावरच झोपायचे. चार महिन्यात मुस्ताकीम पायमशीन व्यवस्थित वापरायला शिकला आणि एक चांगला शिंपी झाला. ''माझी धारणा होती की जर मी कष्ट केले तर अल्ला माझ्यावर प्रसन्न होईल. मी सर्व कामगारांना सांगायचो की एक दिवस मी देखील एका कारखान्याचा मालक असेन.''

1947 साली धारावीमध्ये राहणाऱ्या एका नातेवाईकाला मुस्ताकीमनं त्याच्या राहत्या घरात दोन शिवणयंत्रे ठेवण्यासाठी तयार केलं. मुस्ताकीम स्वत: एक मशीन चालवायचा आणि दुसरं चालवण्यासाठी त्यानं एका कामगाराला नेमलं. काही ना काही जॉबवर्क ते मिळवायचे आणि दिवसभर काम करायचे. पण खूप वेळा त्यांना जी शिलाई मिळायची त्यापेक्षा अधिक त्यांचे खर्चच असायचे. त्यामुळे पूर्वी कारखान्यात नोकरी करून जे थोडे पैसे घरी पाठवणं शक्य होतं ते आता स्वतःचा व्यवसाय सुरू केल्यावर जमेनासं झालं.

पण हळूहळू मुस्ताकीनं बस्तान बसवलं आणि धंदाही वाढवला. खोल्या भाड्यानं घेऊन 10 शिवणयंत्रावर काम धडाक्यानं सुरू केलं. यंत्रावर काम करणारे लोक तिथेच राहायचे. पण या टप्प्यावर मुस्ताकीम यांना आत्मविश्वास वाटू लागला की हा धंदा आता नक्की जमणार. गावाकडे त्यांनी मदतीसाठी निरोप धाडून त्यांच्या दोन भावांनाही मुंबईत बोलावून घेतलं. तिसरा भाऊ मात्र जमिनीची देखभाल करायला गावीच राहिला. मुस्ताकीमच्या प्रत्येक हालचालीतून आज जरी सुबत्ता जाणवत असली तरी अजूनही कुट्टीवाडीतल्या एका टपरीमधूनच त्यांचा सर्व कारभार चालतो आणि मुसळधार पावसानंतर तर तिथे पोहोचणंही अशक्य होतं.

तयार कपड्याची निर्यात करणारे आणखी एक-दोन जण धारावीत आहेत आणि अशांसाठी जॉबवर्क करणारे डझनवारी आहेत. नव्यानं परत बांधलेल्या चामडा बझार किंवा 92-93 च्या दंगलीत जमीनदोस्त झालेल्या बगिचा विभागात हे लोक कोपऱ्याकोपऱ्यावर आढळतात. पण धारावीतले बहुसंख्य तयार कपड्यांचे उद्योजक स्थानिक बाजारपेठेसाठीच कपडे शिवतात.

यामध्ये हाजी अब्दुल हक अन्सारी यांच्यासारखेही आहेत. दंगलीच्या वेळी माझगाव येथील त्यांच्या कारखान्याला आग लावून दिल्यानंतर अन्सारी यांना त्यांचा उद्योग संपूर्णपणे धारावीत हलवावा लागला. त्यावेळी त्यांना कैदही झाली होती आणि त्यांचे हात मोडले होते. त्यावेळच्या कटू आठवणी आणि डोळ्यातली उदासी अजून ताजी आहे आणि हे त्यांच्याशी बोलताना स्पष्टपणे जाणवतं.

धारावीच्या 90 फुटी रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या अनेक नगरांपैकी इंदिरा कुरेशी नगरामध्ये अन्सारी यांचा कारखाना आहे. अरुंद अशा बोळकांडीतून तुम्ही तिथे एकदा प्रवेश केलात की तुम्हाला वाटेल तुम्ही भारताच्या एका वेगळ्याच प्रदेशात आला आहात. हा भाग केवळ उत्तर प्रदेशातला नसून त्यालाही एका विशिष्ट जिल्ह्यातला गोंडा जिल्ह्यातला आहे. अन्सारी यांच्याप्रमाणेच इंदिरा कुरेशी नगरातले बहुसंख्य गोंडा जिल्ह्यातून आलेले आहेत.

त्यांच्यातलाच एक आहे 12 वर्षाचा जमिल जो भरतकाम झालेली कापडं साफ करतो. हा दररोज 12 तास काम करतो, कारखान्यातच जेवतो, तिथेच झोपतो आणि आपलं गाव सोडून आपण कुठल्या कुठे येऊन पडलोय असं त्याला अजिबात वाटत नाही. हा मोठा झाल्यावर काय करेल? ''कदाचित मी

देखील एखाद्या कारखान्याचा मालक असेन'' जमिल म्हणतो आणि धारावीतल्या इतक्या लोकांनी हे यशस्वीपणे करून दाखवलेलं आहे की जमिलचं हे स्वप्न अजिबातच अवास्तव वाटत नाही.

जमिलचे साहेब अन्सारी उत्तर प्रदेश मधून 1965 साली मुंबईत आले आणि शिवणाची लहानमोठी कामं करायला सुरुवात केली. आज त्यांच्याकडे अनेक मशीन्स, कामगार असून निर्यातदारांकडून त्यांना जॉबवर्कची कामे मिळतात. लहान प्रमाणावरचा व्यावसायिक असं स्वत:ला म्हणवणारे अन्सारी वर्षाला अंदाजे सात लाख रुपये मिळवतात. त्यांच्यापेक्षा मोठा धंदा असणारे नक्कीच दुप्पट मिळवत असतील असं त्यांना वाटतं. दंगलीनंतर गोंडा जिल्ह्यातल्या लोकांना एकत्र येऊन छळ, लुबाडणूक, यांच्या विरोधात एकमेकांचे रक्षण करण्यासाठी शालिमार नावाची सोसायटी स्थापली. तिथल्या 70 रहिवाशांपैकी निम्मे जण तयार कपडे बनवणाऱ्यांमधले मोठे व्यावसायिक आहेत. अन्सारी दररोज 500-600 शर्ट बनवतात. पीस रेटनुसार कामगारांना पैसे दिले जातात आणि प्रतिदिवी 150/- रुपये एखादा कामगार मिळवू शकतो. यातले काही कामगार मूळचे बिहारचे आणि काही तामिळनाडूतले आहेत. अन्सारी यांना वाटतं की धारावीमध्ये त्यांच्यासारखे जॉबवर्क करणारे किमान 500 जण तरी असावेत आणि मशीनवरचं भरतकाम आणि झरदोजी भरतकाम करणारे साधारणपणे 100 असावेत.

झरदोजी भरतकाम फार कलाकौशल्याचं आहे. आणि हे काम साधारणत: बंगाल आणि बिहारमधून आलेली तरुण मुले करतात. रॅकवर कापड ताठपणे खेचून घेतलेलं असतं आणि सभोवताली बसून हे तरुण भरतकाम करतात. अपुऱ्या उजेडामध्ये चांदी, सोन्याच्या धाग्यानं हे डोळेफोड करणारं किचकट भरतकाम चालू असतं. इतर व्यवसायांप्रमाणे इथेही कामगार कामाच्याच ठिकाणी जेवतात आणि झोपतात.

याचबरोबर मशीनवर भरतकाम करणारे खूप पुरुष तुम्हाला दिसतात. यातले बरेचजण बंगालमधून आलेले आहेत. अहोरात्र चाललेल्या मशीनच्या घुर्रर्ऽऽऽ घुर्रर्ऽऽऽ आवाजावरूनच तुम्हाला या कारखान्याचा माग काढता येईल. मशीनवर केलेलं भरतकाम साधारणत: स्थानिक बाजारपेठेसाठी असतं.

चामड्याच्या व्यवसायाच्या बरोबर विरुद्ध धारावीतला तयार कपड्यांचा व्यवसाय आहे. निर्यात कितीही कमी/जास्त झाली तरी या व्यवसायावर त्याचा परिणाम होत नाही कारण बराचसा माल स्थानिक बाजारपेठेसाठीच बनवला जातो. सोशलनगरच्या गल्लीमध्ये याचा लगेच प्रत्यय येईल. दुतर्फा असलेल्या डझनभर दुकानात कापड बझारातलं दृश्य. सर्व दुकानात ट्यूबटाइल, पंखे, जमिनीवर लिनोलिअम आणि वकारखान प्यारे यांच्यासारख्यांच्या काही दुकानात तर तयार शर्टांनी भरलेली मोहक शेल्फ्ससुद्धा दिसतात. गल्लीत सूर्यप्रकाश कधीच पोहचत नाही.

शून्यातून विश्व उभं करणाऱ्या यशस्वी कहाण्यांमध्ये वकारखान यांची कथा अग्रक्रमाने घ्यावी लागेल. उत्तर प्रदेशात रायबरेली जिल्ह्यात आठवीपर्यंत शिक्षण घेतलेले वकारखान 1978 साली जेव्हा मुंबईत आले तेव्हा ते 13 वर्षाचे होते. एके काळी त्यांच्या कुटुंबाकडे बरीच जमीन होती पण नंतर तिचे तुकडे विकत विकत एक वेळ अशी आली की ती जमीन एवढ्या मोठ्या कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी अपुरी पडायला लागली. आईवडील, दोन भाऊ, दोन बहिणीच्या घरात वयाने थोरले असलेले वकार यांना मुंबईला कामधंदा शोधायला पाठवण्यात आलं. धारावीत घर असलेल्या काकांकडे वकार राहायला लागले.

केळी विकून वकारखान यांनी कामाला सुरुवात केली. एक वर्षभर त्यांनी हा उद्योग केला. मग दादर स्टेशनच्या समोर तयार कपडे विकण्याचं काम त्यांना मिळालं. इतर फेरीवाल्यांप्रमाणे वकार यांनाही दररोज महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा त्रास सहन करावा लागायचा. पण कसं तरी काम चालू ठेवून त्यांनी चार पैसे बाजूला टाकले. या पैशानं

त्यांनी दोन शिवणयंत्र भाड्यानं घेतली. दरमहा पाच रुपये भाडे देऊन राहात असलेल्या त्यांच्या खोलीत त्यांनी ही दोन्ही शिवणयंत्र सुरू केली आणि जॉबवर्क घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या नशीबानं त्यांना एक असं गिऱ्हाईक मिळालं ज्याच्याकडून त्यांना नियमित काम मिळे. लवकरच वकार यांच्या लक्षात आलं की स्थानिक बाजारपेठेला पुरवठा करण्यामध्येही चांगला धंदा आहे. आज 12 कामगार आणि तीन दुकानं असलेले वकारखान भारतभर शर्ट विकतात आणि 70 लाख रुपयांची वार्षिक उलाढाल करतात.

**अन्न : खमंग ... स्वादिष्ट**

एकवेळ कपडे शिवण्याची यंत्रसामुग्री तुम्ही पोटमाळ्यावर लपवू शकाल पण अन्नाचा वास नाही तुम्ही दडवू आणि दडपू शकत! कल्पना करा कचऱ्याची झालर असलेल्या धारावीमधल्या रस्त्यावरून तुम्ही येत आहात आणि तुपाचा खमंग वास तुमच्यावर चाल करून येतो. शस्त्रक्रियेसाठी लागणारा धागा बनवणारे, अब्दुल बाका ज्या डायमंड अपार्टमेंट्समध्ये राहतात त्याला लागूनच उंच फाटकाच्या मागे मोठं आवार असलेली कारखानासदृष्य एक इमारत आहे.

या जागेतच गुलाबजाम, रसगुल्ले, चमचम, मोतीचूर लाडू, काजू बर्फी आणि इतर अनेक मिठाईचे पदार्थ बनवले जातात. मुंबईतल्या एखाद्या पंचतारांकित हॉटेलात जेव्हा तुम्ही गुलाबजाम खाता तेव्हा बहुदा धारावीत बनवलेला गुलाबजाम तुम्ही खात असता.

1949 साली बांधलेल्या सोडा वॉटर फॅक्टरीमध्ये - डायमंड एरेटिंग वर्क्समध्ये आज पंजाबी घसिटाराम कराचीवाला यांचा कारभार पसरला आहे. मुंबईत इतरत्र असलेला कारखाना हलवून घसिटाराम यांनी तो या जागी 1978 मध्ये आणला. फाळणीनंतर भारतात आलेल्या गोवर्धन घसिटाराम बजाज यांनी या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. स्वतंत्र भारतातही मिठाई बनवण्याचाच व्यवसाय चालू ठेवायचं त्यांनी ठरवलं होतं. 1916 पासून त्यांच्या कुटुंबाचा कराचीत हाच व्यवसाय होता. त्यांच्या मुलांनीही व्यवसाय पुढे चालू ठेवला पण इतके दिवस एकत्र असलेल्या व्यवसायाची 1978 साली विभागणी झाली. त्यातल्याच एका भावाचा कारखाना आता धारावीत आहे.

कारखान्याचे व्यवस्थापक श्री. मोहन कात्रे यांना त्यांच्या कामाच्या प्रत्येक पैलूबद्दल मुंबईतल्या व्यवसायाला सुरुवात झाली तेव्हापासून कात्रे बजाज घराण्याबरोबर आहेत. कात्रे यांच्या म्हणण्यानुसार धारावीतला हा मिठाईचा कारखाना मुंबईतला तरी नक्कीच सर्वात मोठा मिठाईचा कारखाना आहे आणि कदाचित भारतातलाही.

डायमंड एरेटिंग वर्क्सच्या मालकीचा असताना कारखाना जसा होता तसाच तो आजही आहे. खूप उंच छत असलेल्या प्रचंड गुहेसारखा एका मोठ्या हॉलमध्ये कामगार गटागटानं वेगवेगळी कामं करत असतात. एका टोकाला दूध उकळण्यासाठी स्टेनलेस स्टीलचे मोठे हंडे आहेत. बाजूला मोठ्या लोखंडी कढया आहेत ज्यामध्ये गुलाबजाम किंवा बंगाली मिठाईसाठी दूधाचा खवा बनवला जातो. कारखान्यात दररोज 2000 लिटर म्हशीचं आणि 800 लिटर गाईचं दूध वापरलं जातं. मुंबईजवळच्या वसई, दहिसर, तुर्भे या गावातून दररोज सकाळी कारखान्याच्या फाटकापाशी हे दूध येतं.

या व्यवसायातला गंमतीचा, नोंद घेण्याचा भाग म्हणजे कामगारांचे वेगवेगळे गट भारताच्या वेगवेगळ्या प्रांतातून आलेले आहेत. बंगालमधून आलेले कामगार चमचम आणि रसगुल्ले बनवतात. पंजाबी कामगार लाडू आणि गुलाबजाम, मराठी लोक काजू कत्री आणि इतर बर्फ्या आणि उत्तर प्रदेशाचे भैय्या खवा आणि खव्यापासून बनवली जाणारी इतर मिठाई बनवतात. त्याचबरोबर सामोसे वगैरे तिखटामिठाचे पदार्थही बनवतात. कात्रे यांचे म्हणणं आहे की ज्या प्रांतातून लोक येतात त्या प्रांतातली मिठाई त्यांनीच बनवावी कारण त्यांना ती उत्तम जमते.

घसिटाराम यांच्या कारखान्यात जवळजवळ 200 कामगार आहेत जे तिथे आत आवारातच किंवा जवळच राहतात. 1992-93 च्या दंगलीमध्ये कारखान्याला काही झालं

नाही कारण सर्व कामगार तिथेच होते. पोलिसांना खुश ठेवण्याची दूरदृष्टी कारखान्याच्या मालकांनी दाखवली. दंगलीचा डोंब उसळलेला असताना 200 पोलिस कारखान्यात जेवत होते. त्यामुळे मिठाई तयार होऊन वितरणासाठी व्हॅनमध्ये भरली गेली तेव्हा या सर्व वाहनांना पोलिस संरक्षण मिळाले.

खाद्यपदार्थांमधला इथला आणखी मोठा व्यवसाय म्हणजे चिक्की, चणे, चकली आणि म्हैसूरपाक बनवण्याचा. धारावी क्रॉस रोड रस्त्यावरून जर चालत गेलात तर दुतर्फा असलेल्या दुकानात, घरी बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांचा माल खचाखच भरलेला दिसेल. या दुकानाच्या मागच्या गल्लीतल्या घराघरातच हे खाद्यपदार्थ बनवले जातात आणि त्यांचे पॅकिंगही तिथेच होते.

1992-93 पर्यंत सर्व तमिळ लोक, मग ते हिंदू असोत वा मुस्लिम, आपापल्या धर्मावरून ओळखले न जाता, त्यांच्या प्रांतावरून ओळखले जायचे. पण दंगलीनंतर हे सर्व बदललं. जरी एका तमिळी माणसानं दुसऱ्या तमिळी माणसावर हात टाकला नाही तरी हिंदू तमिळ लोकांनी उत्तर प्रदेशच्या मुस्लिम लोकांवर हल्ला चढवणं किंवा याच्या उलट परिस्थितीमुळे तमिळ समाजाचं, धर्माच्या मुद्द्यावरून ध्रुवीकरण झालं.

इथे अपवाद आहे धारावीमध्या चिक्की बनवणाऱ्यांचा. इथल्या एकूण 27 व्यावसायिकांपैकी हाजी शमसुद्दीन एकटेच मुस्लिम आहेत पण वयानं ते सर्वात मोठे आणि व्यवसायाचे पिता असल्यामुळे सर्वांना त्यांच्याबद्दल आदर आहे. सर्वजण नेहमीच त्यांच्याशी सर्व बाबतीत सल्लामसलत करतात. अगदी घरगुती प्रश्नांमध्येही त्यांचा सल्ला व मार्गदर्शन घेतलं जातं.

शहरभर आणि बाहेरही सर्वत्र विकली जाणारी शेंगदाणा चिक्की धारावीमध्ये टनावारी बनवली जाते. तिरुनेलवेल्लीहून स्थलांतरित झालेले रामस्वामी कामराजनगरामध्ये राहतात. हे नगर म्हणजे तिरुनेलवेल्लीहून आलेल्या लोकांचाच मुलुख बनलेला आहे. रामस्वामी यांच्या बायकोला तमिळ सोडून दुसरी कुठलीही भाषा नीट बोलता येत नाही आणि अनोळखी लोकांशी काही बोलण्याची तर त्यांना भीतीच वाटते. पण त्यांची मुलगी सेल्वी आता चाटर्ड अकौटन्सीचा अभ्यास करते आहे. चिक्की व्यवसायतल्या नफ्यामुळे केवळ एका पिढीत एवढे बदल आणि प्रगती झाली आहे.

चिक्की आणि मिठाई बनवण्याबरोबरच धारावीत तुम्हाला अनेक बायका पापड लाटताना दिसतील. यातल्या काही जणी हे काम लिज्जत पापडासाठी करतात. श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड ही स्त्रियांची संस्था असून1959 साली संस्थेच्या कामाला सुरुवात झाली. मध्य मुंबईतल्या काही स्त्रिया एकत्र आल्या. थोडे जादा पैसे मिळवण्यासाठी त्यांनी पापड लाटण्याचं काम सुरू केलं. आज भारतभर 40,000 सदस्य असलेली ही संस्था खूप मोठी झाली आहे. मुंबईतच नोंदणी झालेल्या सदस्यांची संख्या 8000 असून त्यापैकी 50 जणी धारावीत राहतात. दररोज या स्त्रिया परत बांद्र्याला जाताना दिसतात. लाटलेले पापड उन्हात चांगले वाळवून मग ते परत संस्थेकडे दिले जातात. या कामाचे या स्त्रियांना रोजचे 50-60 रुपये मिळतात.

अर्थात पापड लाटणाऱ्या सर्वच स्त्रिया लिज्जत पापडासाठी काम करतात असं नसून काही खाजगी उद्योजकांसाठीही त्या हे काम करतात पण कदाचित त्यांना एवढा रोजगार मिळत नसेल. तसेच खाजगी उद्योगांमध्ये कामावर देखरेख विशेष नसते. त्यामुळे खूपदा कचऱ्याच्या ढिगाजवळ टोपल्यांवर पापड वाळताना दिसतात, किंवा त्यांच्यावर माशा घोंगावत असतात. लिज्जत पापड संस्थेचे अधिकारी आग्रहपूर्वक सांगतात की पापड लाटताना/वाळवताना स्त्रियांनी किमान स्वच्छता पाळलीच पाहिजे हा दंडक आहे आणि हे केलं जात आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी संस्थेतर्फे वारंवार पाहणी केली जाते.

**बन, बटर आणि पाव**

धारावीमधले अन्नपदार्थ बनवण्याच्या पद्धतींना आधुनिकतेचा स्पर्शही झालेला नाही. कारण गॅस, वीज आदी गोष्टी उपलब्ध असूनही धारावीतल्या सर्व बेकऱ्यांतल्या भट्ट्या अजूनही जळणासाठी लाकूड वापरतात. 50 वर्षांपेक्षाही अधिक काळ या भट्ट्या याच पद्धतीनं पेटवल्या जात आहेत.

80 वर्षाचे हाजी अब्दुल शकुर जमालउद्दीन हे धारावीतले सर्वात जुने बेकरीवाले आहेत. नगिना बेकरीच्या पाठोपाठ 1952 मध्ये सुरू केलेल्या मकदुमिया बेकरीचे ते मालक आहेत. या वयातही दिवसातून दोन वेळा ते स्वत: बेकरीमध्ये पाहणी करायला येतात.

आता जर तुम्हाला जमालउद्दीन याची कथा ओळखीची वाटायला लागली असेल तर ती आहेच तशी. इतर अनेक लोकांप्रमाणे जमालउद्दीन यांचे वडील 1928 मध्ये मुंबईत कामाच्या शोधात आले. उत्तर प्रदेशच्या बिजनोर जिल्ह्यातील महम्मदाबाद हे त्यांचं मूळ गाव. मुंबईत येऊन त्यांना एका बेकरीत काम मिळालं आणि त्यांनी या व्यवसायातलं सर्व काही शिकून घेतलं. 10 वर्षानंतर जमालउद्दीन मुंबईत आले आणि इथल्या शाळेत जाऊ लागले. 1952 साली त्यांच्या वडिलांनी धारावीतल्या अबू बक्र चाळीत एक गोदाम विकत घेतलं आणि तिथे मकदुमिया बेकरी सुरू केली. या बेकरीत दोन भट्ट्या असून त्यामध्ये पाव, इराणी बेकरीवाल्यांनी प्रसिद्ध केलेलं बटर नावाचं खारं बिस्किट, गोड कुरकुरीत टोस्ट आणि बन भाजले जातात. या सगळ्याचं रोजचं उत्पादन अंदाजे 270 किलोग्रॅम आहे.

धारावीच्या मुख्य रस्त्यावर मकदुमिया बेकरीच्या मागे मामूची बेकरी आहे. 45 वर्षाच्या अब्दुल अजिझखान यांना 'मामू' या नावानंच अधिक ओळखतात. मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका मोठ्या आवाराचे मामू मालक आहेत. पण आपण त्यांना तसं विचारलं तर ही गोष्ट ते साफ नाकारतात आणि सांगतात की ते निव्वळ भाडेकरू असून एक मुस्लिम स्त्री जागेची मालक आहे. पण व्यवहारात अतिशय मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागेचे ते मालक आहेत. जागेच्या दोन बाजूंना निवासी खोल्या आहेत आणि दुसऱ्या दोन बाजूंना बेकरी आहे.

मामूची बेकरी धारावीमध्ये सर्वांना माहीत आहे. आज तिथे बेकरी आहे तिथे पूर्वी चामडे कमावण्याचा कारखाना होता. जमालउद्दीन यांच्याप्रमाणेच मामू हे व्यवसायानं बेकरीवाले नाहीत. बेकायदेशीर दारूचा धंदा ऐन तेजीत असताना वखारीच्या व्यापारात मामू यांनी चांगला पैसा कमावला. देशी दारू गाळण्याचं धारावी हे मुख्य केंद्र असल्यामुळे भट्ट्यांसाठीही खूप लाकूडफाटा लागायचा. याखेरीज बेकरीमधल्या भट्ट्यांसाठीही अनेक टन लाकूडफाटा लागायचा.

मामू यांच्या अंदाजानुसार त्या काळी धारावीमध्ये 15 ते 16 मोठ्या आणि कमीत कमी 50 छोट्या दारू गाळण्याच्या भट्ट्या होत्या. दररोज एक मोठ्या भट्टीत दारूच्या किमान 100 ट्यूबा तयार व्हायच्या आणि एका ट्यूबमध्ये अंदाजे 15 लिटर दारू मावायची. सर्व भट्ट्या पूर्ण वेळ, पूर्ण क्षमतेनुसार चालवल्या असं मानलं आणि ढोबळ हिशेब केला तरी लक्षात येतं की धारावीत दररोज 25000 लिटर बेकायदेशीर देशी दारू बनवली जायची.

पोलिसांनी धारावीतला बेकायदेशीर दारू गाळण्याचा धंदा बंदच पाडायचा ठरवल्यानंतर मामू यांनी व्यवसाय बदलला आणि ते बेकरीकडे वळले. आज त्यांच्या बेकरीत, लाकूडफाट्यावर चालणाऱ्या दोन मोठ्या भट्ट्या आहेत आणि तिथे बन (कडक पाठीचा बन) आणि ब्रेड रोज रात्री बनवला जातो. विविध उपहारगृहांमध्ये हा बन आणि ब्रेड पहाटेच पोहोचवला जातो आणि मग मुंबईकर त्यांचा लाडका बन-मस्का खाऊन, चहा पिऊन कामावर जातात. मामू यांच्या बेकरीत रोज 150 किलो खारी आणि 100 किलो बटर बिस्किटेहे बनवली जातात.

मामू यांच्या बेकरीतले बहुसंख्य कामागार आझमगढ जिल्ह्यातले आहेत. सर्वजण रोजावर काम करतात आणि कायमस्वरुपी नोकरीत कुणीच नाहीत. जे भट्टी सांभाळतात त्यांना सर्वात जास्त पैसे मिळतात. अंदाजे 80 रुपये रोज आणि त्यांना सगळीकडे खूप मागणी असते. यानंतरचं कौशल्याचं काम असतं पीठ भिजवण्याचं आणि तिंबण्याचं. उरलेल्या सर्वांना - पॅकिंग करणाऱ्यांना, सफाई करणाऱ्यांना (ज्यामध्ये महिला आहेत) - दिवसाचे फक्त 25/- रुपये मिळतात.

मामू यांच्या बेकरीतलं दृश्य जवळपास अद्भूत असतं. मोकळेढाकळे सुती पायजमे आणि बनियान घातलेले पुरुष भट्ट्यांमधला लाकूडफाटा आत सरकावून भट्ट्या धगधगत्या ठेवत असतात. काहीजण मोठ्या दगडी ओटऱ्यांवर पीठ मळत असतात. खोलीच्या दुसऱ्या टोकाला काही पुरुष आणि स्त्रिया मोठ्ठाल्या ट्रेना तेल लावत असतात. मग मळलेल्या पीठाचे साचे या ट्रेमध्ये ठेवले जातात. प्रत्येकजण सांघिक भावनेनं, शांतपणे काम करत असतो. एक शब्दही बोलण्याची गरज नसते कारण प्रत्येकाला त्याचं काम माहीत असतं. काहीजण तिंबलेल्या पिठाचे  भाग करून ते साच्यात ओतत असतात. नंतरचा गट लगेच प्रत्येक साचा काळजीपूर्वक उचलून तेल लावलेल्या ट्रेमध्ये तो ठेवतो. दोघेजण मग दोन भट्ट्यांच्या कडेला हे ट्रे ठेवतात आणि लांबलचक लोखंडी सळईने हे ट्रे आत भट्टीत सारतात. ट्रे बाहेर कधी काढायचे हे या कामगारांना जणू अंतर्ज्ञानानं माहीत असतं. खमंग, खरपूस भाजलेला सोनेरी / तपकिरी पाव किंवा खारी किंवा बटर मग बाहेर काढून गार होण्यासाठी बाजूला ठेवले जातात आणि पूर्ण गार झाल्यानंतर पॉलिथिनमध्ये त्यांचे पॅकिंग केलं जाते.

पत्र्याच्या पेटीमध्ये बेकरीतले ताजे पदार्थ ठेवून ती पेटी डोक्यावर घेऊन घरोघरी पायी जाऊन फेरीवाले हे पदार्थ विकतात. किंवा सायकलवर मोठा ट्रे मागच्या आणि पुढच्या हँडलच्या दोन्ही बाजूला ब्रेडनं भरलेल्या दोन मोठ्या पिशव्या लावून तोल सांभाळत सायकलवालेही हे पदार्थ विकतात. हे काम करणारे लोक जास्त करून उत्तर प्रदेशचे आहेत आणि थोडे दक्षिणेकडचेही आहेत. नव्यानं भरती झालेले मात्र सर्व बिहारी आहेत. फेरीवाल्यांचा एक गट प्रत्येकी बेकरीशी जोडलेला असतो. त्यांना झोपायला जागा मिळते आणि त्यांच्या बदल्यात ते बेकरीतले पदार्थ विकत घेतात आणि घरोघरी जाऊन विकतात.

1952 मध्ये जेव्हा जमालउद्दीन यांनी त्यांची बेकरी सुरू केली तेव्हा धारावीत आणखी दोन बेकरीवाले होते. आज धारावीत या व्यवसायात 25 पेक्षा अधिक जण आहेत. बहुतेकांकडे लाकूडफाट्यावर चालणाऱ्या दोन भट्ट्या आहेत. ज्या ठिकाणी या बेकऱ्या आहेत तिथे पहाटे धुराचं एक छतच निर्माण होतं. तिथे राहणारे लोक तक्रार करतात पण त्याबाबत काहीच केलं जात नाही. प्रदूषण आटोक्यात ठेवणं हा धारावीतल्या बहुसंख्य रहिवाशांचा निकडीचा प्रश्न नाहीये.

## धूर आणि आग

मुकुंदनगरमध्ये खोल्यांच्या आत धूर आणि विस्तव आहे. धारावीतल्या या अरुंद गल्लीत तुम्हाला ओतकामाच्या ओबडधोबड भट्ट्या दिसतील जिथे चामड्याच्या पर्स आणि पट्ट्यांसाठीची पितळी बकलं बनवली जातात. भूतलावर नरक आहे असं जर आपण घटकाभर मानलं तर तो या गल्लीत आहे असंच म्हणलं पाहिजे.

कामाची सुयोग्य परिस्थिती, तिथली सुरक्षितता किंवा उलटपक्षी ठराविक काम करण्यामधले धोके आदी गोष्टी इथल्या कुठल्या लोकांनी ऐकलेल्याच नाहीत त्यामुळे त्या माहीत असण्याचा प्रश्नच येत नाही. त्या माहीत नसल्यामुळेही दिवसभराच्या उत्पादनात कसलीच खीळ पडत नाही. औद्योगिक युगाच्या सुरुवातीला ज्या प्रकारची ओबडधोबड, मागास उत्पादन यंत्रणा होती त्या यंत्रणेशी नातं सांगणारी ही उत्पादन व्यवस्था आहे. आवश्यकता असते फक्त जागेची. मग धुराडे, थोडा कोळसा, थोडी वाळू, थोडं मोटर ऑईल आणि परिस्थितीपोटी स्वत:च्या तब्येतीची अजिबात फिकीर न करणारे, फुफ्फुसांची पार वाट लावून घ्यायला तयार असणारे गरीब कामगार.

ज्या गल्लीतून आपण चाललो आहोत तिची रुंदी जेमतेम तीन फूट आहे. दोन्ही बाजूला 8×6 फुटांच्या, धुरामुळं काजळीची पुटं चढलेल्या अंधारलेल्या खोल्या आहेत. खोलीत शिरल्याबरोबर तुम्हाला विस्तवाचा चौकोनी खड्डा दिसतो. त्यावर लोखंडी जाळी ठेवलेली असते आणि त्या जाळीवर धगीतले पेटलेले कोळसे ठेवले जातात. विस्तव धगधगून उठतो. पितळेचे तुकडे असलेले मातीचं भांडं आता त्या कोळशांवर ठेवलं जातं. धगधगत्या आगीमुळे थोड्याच वेळात धातुचे तुकडे वितळतात.

खड्ड्यातून निघणाऱ्या धुरानं खोली लगेच भरून जाते. त्या धुरकटलेल्या खोलीतच चार माणसं, मध्ययुगीन पद्धतीनं तो वितळलेला धातू साच्यात ओतून, त्यापासून बकलं तयार करताना आपल्याला दिसतात. हे काम करणारे बरेच जण उत्तर प्रदेशाचे लोक आहेत. ते सर्वजण म्हणतात की दुसरं काही काम मिळेपर्यंतच ते हे काम करणार आहेत. आयुष्यभर हे काम आणि या पद्धतीनं करण्याची कुणाचीच तयारी नाही.

अनेक प्रकारचे साचे, वाळू आणि मोटर ऑईलच्या मिश्रणानं भरलेल्या पेट्या खोलीभर पडलेल्या असतात. प्रत्येक पेटीच्या दोन्ही बाजूंवर साच्यापासून बनवलेलं उठावदार चित्र आहे. असे अनेक साचे भिंतीवर लटकत असतात. पितळं वितळलं की एक माणूस तो वितळलेला धातू साच्यात ओततो. तो पेटी बंद करतो. काही सेकंद वाट बघून पटी उघडतो आणि चिमट्याच्या सहाय्यानं ती बकलांची माळ साच्यातून बाहेर काढतो. दुसरा मुलगा लगेच चिमट्याच्याच मदतीनं माळेतले एकेक बकल सुटे करतो आणि त्यांना ट्रेमध्ये फेकतो. अजूनही ती भयानक गरम आहेत. ज्या मधल्या पट्टीने 12 बकले एकत्र धरली होती ती पट्टीही वितळवण्यासाठी परत विस्तवात फेकली जाते.

बकलांनी गच्च भरलेला ट्रे मग गल्ली ओलांडून समोरच्या बाजूला असलेल्या बफिंग युनिटमध्ये नेण्यात येतो. तीन कामगार तिथे बकलांना काळजीपूर्वक पॉलिश करत असतात. इतकं सुंदर पॉलिश केलं जातं की बकलं सोन्याची असल्यासारखी झळाळून उठतात. एका भट्टीत दररोज 1200 किंवा त्यापेक्षा थोडी अधिक बकलं तयार होतात. तयार झालेली बकलं मग प्लॅस्टिकच्या पिशव्यात घालून गल्लीच्या टोकाशी असणाऱ्या ''धान्याकडे'' नेली जातात.

उत्तर प्रदेशातल्या मोरादाबादचे इलियासभाई इथले ''धनी'' आहेत. मूळचे विणकर असणाऱ्या इलियासभाईंनी मुंबईत आल्यावर व्यवसाय बदलला. ते धातू कामगार झाले. पितळी कामासाठी मोरादाबाद खरंतर प्रसिद्ध आहे पण इलियासभाई यांच्या कुटुंबातलं कुणीच या व्यवसायात नव्हतं. उंच, तुकतुर्कात काळ्या रंगाच्या इलियासभाईंना खूपजण 'मद्रासी'चा समजतात. म्हणूनच शेजारीपाजारी त्यांना अण्णा म्हणून हाक मारली जाते.

मुकुंदनगरातल्या या अंधाऱ्या आणि कळकट्ट गल्लीतच बकलं बनवणारे अनेक छोटे कारखाने आणि बफिंग युनिट्स आहेत. या कारखान्यात काम करणारे लोकच तिथे राहतात. चेहऱ्यावरचा हताश भावच त्यांच्या आयुष्याची खरी कथा सांगतो. तुम्ही जर त्यांच्या आयुष्याबद्दल, कामाबद्दल काही जाणून घेण्यात रस दाखवलात तर त्यांना तुमच्याशी बोलायची इच्छा असते. इलियासभाई यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या कामगारांना रोजी 200/- रुपये मिळतात. पण त्यांच्यातलाच एक कामगार हेही सांगतो की दर महिन्याला कसेबसे 1200/- रुपये हाती पडतात. कारण महिन्यातले साधारणपणे 15 दिवसच काम मिळतं.

कामगार आजारी पडतात तेव्हा काय? तत्काळ उत्तर येतं. : ''धनी सगळ्यांची काळजी घेतात.'' क्षणाच्या अवधीनंतर एक कामगार पुढे येऊन पुटपुटतो ''दीदी, तुम्हाला खरं ते सांगतो, धनी आमच्यासाठी काहीच करत नाहीत. आम्ही आजारी पडलो तर आमचं आम्हीच सगळं बघायचं.''

कामाच्या परिस्थितीबद्दल काही बोलण्याची भीतीच, हे कामगार कधीही संघटित होणार नाहीत याची खात्री देते. कामाच्या परिस्थितीबद्दल कामगारांनी जर काही हरकतीचे मुद्दे उपस्थित केले तर मालकाला त्यांच्याऐवजी कामासाठी टपून बसलेले आणखी दहा जण मिळतील. मुंबईत कामगारांची अजिबात कमी नाही. म्हणून जर तुम्हाला काम/नोकरी मिळाली असेल तर दुसरा अधिक चांगला पर्याय मिळेपर्यंत हातातल्या कामाल चिकटून राहण्याची वृत्ती सर्वांनी अंगी बाणवलेली आहे. संघटना बांधणी आणि कामाच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या कामात ही वृत्ती अगदी खात्रीलायकरित्या खीळ घालते हे तर उघड आहे.

श्वासोच्छ्वासातून दररोज शुद्ध विषच या कामगारांच्या

शरीरात जात असतं. सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साईड आणि कॉपर, आयर्न ऑक्साइड, आर्सेनिक, अँटिमनी, कॅडमिअम, लेड, मर्क्युरी आणि झिंक अशा अनेक धातूंचे कण श्वासोच्छ्वासावाटे शरीरात जात असतात. त्यांच्या शरीरात हे काय जात आहे, त्यांना कळतंय का? ''आम्ही तोंडात गुळाचा खडा ठेवतो म्हणजे खोकला येत नाही.'' तत्त्ववेत्त्याप्रमाणे एका कामगारानं सांगितलं. पण त्यांच्या फुफ्फुसांची काय स्थिती झाली असेल? त्यांचा रंग काय झाला असेल? इथेच काम करत राहिले तर ते आणखी किती दिवस जगतील? कुणालाही माहीत नाही आणि कुणाला पर्वाही नाही.

आरोग्याला धोकादायक असे अनेक उद्योग धारावीच्या गल्लीबोळात दडलेले आहेत. पितळी बकलं बनविण्याचा उद्योग हा त्यातला केवळ एक झाला. हे उद्योग चटकन नजरेस येत नाहीत. ते अतिशय जोमानं चालतात किंवा वाढतात कारण तिथल्या कामाच्या परिस्थितीबाबत कुणीच हरकत घेत नाही. आणि तिथे काम करून ज्यांच्या आयुष्याला खतरा आहे असे कामगार तर याबाबत बिलकूल आवाज काढत नाहीत. काही बिगर शासकीय संस्था आणि कामगार संघटना यांनी अशा उद्योगांतील धोकादायक, आरोग्याला हानीकारक अशी परिस्थिती जनतेसमोर आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत पण यातून फारसं काही निष्पन्न होत नाही. कारण ज्यांच्यासाठी बाजू लढवायची, मोर्चेबांधणी करायची त्यांनाच या लढाईमध्ये रस नाही. त्यांना फक्त 'आज' माहीत असतो आणि आजच्यापुरतं जगायचं असतं. म्हणजे मग 'उद्या' आजच्यापेक्षा अधिक चांगलं काम शोधता येईल.

**सगळ्याचीच पुनर्मूल्यवृद्धी (रिसायकलिंग एव्हरीथिंग)**

भंगारडेपोदेखील मुकुंदनगरमधल्या ओतकामाच्या कारखान्यांइतकेच भीषण आहेत. फरक एवढाच इथे किमान उजेड तरी आहे. भंगारची पुनर्मूल्यवृद्धी (रिसायकलिंग) हा मुंबईतला कोट्यावधी रुपयांचा धंदा आहे. भंगार प्लॅस्टिकवर पुनर्मूल्यवृद्धीसाठी प्रक्रिया करणं. हे धारावीचं वैशिष्ट्य आहे. एन.एस.डी.एफ.च्या सर्वेक्षणानुसार धारावीतला प्लॅस्टिक पुनर्मूल्यवृद्धीचा व्यवसाय हा भारतातला या प्रकारातला सर्वात मोठा व्यवसाय आहे. या व्यवसायाची वार्षिक उलाढाल1986 मध्ये अंदाजे 60 लाख रुपये होती आणि यामध्ये 5000 पेक्षा अधिक लोक काम करत होते. आता या संख्येत नक्कीच वाढ झाली असेल. प्रक्रिया झालेल्या प्लॅस्टिकची किमान 3000 पोती रोज धारावीतून बाहेर पाठवली जातात.

धारावीत सगळ्यांना माहीत असलेल्या 13व्या कंपाऊंडमध्ये इथले बरेच भंगारडेपो आहेत आणि या भागात भंगाराच्या पुनर्मूल्यवृद्धीचं, पुनर्निर्मितीचं काम विशेष जोमानं चालतं. माहीम-शीव जोडरस्त्याला जिथे 60 फूट रुंदीचा रस्ता मिळतो, तिथे हा सगळा भाग आहे. रस्त्याच्या पलिकडे मिठी नदी आणि माहीमची खाडी आहे. पर्यावरणीय दृष्टिकोनातून हा भाग महत्त्वाचा व संवेदनशील असल्यामुळे त्याचं संरक्षण करायला हवं. पण प्रत्यक्षात हा भाग म्हणजे काहीही फेकून देण्याची जागा झाली आहे. गेल्या वर्षभरातच रस्त्याच्या बाजूला दलदलीचा बराचसा भाग भरून निघाला आहे असं तुमच्या लक्षात येईल. नव्यानं तयार झालेल्या या जमिनीवर पुढच्या सहा महिन्यातच झोपड्या उभ्या राहतील. म्हणजे धारावी थोडी आणखी उत्तरेकडे वाढेल आणि धारावीतले हे नवे सदस्य या दलदलीमध्ये राहतील जसे त्यांचे पूर्वज पाच पिढ्यांपूर्वी धारावीतल्या दलदलीमध्ये इतरत्र राहिले होते.

पण 13व्या कंपाऊंडचा भाग असलेल्या सनोला, जलील आणि बनवारी कंपाऊंड्स या वस्त्या दलदलीतून काही काल नाही वर आल्या. माहीमवरून पुढे बांद्र्याला जाणाऱ्या रेल्वे रुळांच्या पूर्वेकडे या वस्त्या आहेत आणि अनेक दशके त्या भक्कम जमिनीवर उभ्या आहेत. शासनानं थोडी जरी दक्षता दाखवली असती तरी हा संपूर्ण भाग एक तर औद्योगिक क्षेत्र म्हणून किंवा निवासी क्षेत्र म्हणून विकसित झाला असता. 1986 मध्ये जेव्हा धारावीच्या विकासाला थोडी सुरुवात होत

होती तोच लागलेल्या एका मोठ्या आगीनं या भागाचं अतोनात नुकसान केलं. पुन्हा एकदा 'श्री गणेशा'पासून सुरुवात करण्यासाठी ही खरं तर एक नामी संधी होती. पण आधीच्या अनेक वाया गेलेल्या संधीप्रमाणे ही संधीदेखील वाया गेली. या भागाकडे संपूर्ण दुर्लक्ष केल्यामुळे आगीतून वाचलेल्या निवासी वस्तीत, भंगाराची पुनर्मूल्यवृद्धी करणाऱ्या टपऱ्या (रिसायकलिंग शेड्स) मोठ्या संख्येने भराभर उगवल्या. आज दोन्ही गट - भंगाराची पुनर्मूल्यवृद्धी करणारे आणि इथे राहणारी लोकं - एकमेकांच्या सान्निध्यात अवघडलेपणानं राहात आहेत. दोघांपैकी कुणालाच बाहेर हलायचं नाही किंवा कुठलाही बदल नकोय.

मोटरमध्ये वापरायचे तेल शुद्ध कसं केलं जातं आणि मग सगळे वासबिस कसे नाहीसे होतात हे मला नक्की पाहायला मिळेल असं आश्वासन देऊन मला सनोला कंपाऊंडमध्ये नेण्यात आलं. खाण्याच्या तेलात भेसळ करण्यासाठीच फक्त या तेलाची म्हणे विक्री होते. असं जरी कुणी करत असलं तरी अर्थातच कुणीही ते कबूल करत नाही. तेलाच्या शुद्धीकरणाचं काम दाखवण्याऐवजी मला सनोला कंपाऊंडमधले पुनर्मूल्यवृद्धी करणारे विविध व्यवसाय - तेल, प्लॅस्टिक, रासायनिक पिंपे वगैरे पाहायला नेण्यात आलं.

आझमगढच्या निझामउद्दीन यांनी धारावीत सर्वात प्रथम तेलाच्यचा पुनर्मूल्यवृद्धीचा व्यवसाय सुरू केला. 1963 साली ते मुंबईत आले. माझा व्यवसाय अगदी किरकोळ आहे असं ते म्हणतात. 13व्या कंपाऊंडमध्ये आणखी 15 जण याच व्यवसायात आहेत.

वेगवेगळ्या कंपन्या, गॅरेज यांच्याकडून निझामउद्दीन दर महिन्याला 40 ते 50 तेलाची पिंपे विकत घेतात. प्रत्येक पिंपात साधारणपणे 210 लिटर तेल असते. वेगवेगळ्या यंत्रात वापरून टाकाऊ झालेलं हे तेल असतं. विकत घेतलेल्या तेलाची पिंपे साठवून ठेवणे आणि किरकोळ फायद्यात हे तेल व्यापाऱ्यांना विकणं इतकंच निझामउद्दीन यांचं काम आहे. त्यांच्याकडून हे तेल घेणारे व्यापारी पुन्हा कुठल्या तरी वापरासाठी हे तेल गाळतात. पुन्हा वापरात आणलेलं हे तेल अनेक कायदेशीर आणि बेकायदेशीर कामांसाठी वापरलं जातं. रस्त्यावरच्या डांबरामध्ये होणारा या तेलाचा वापर हे एक कायदेशीर वापराचं उदाहरण आणि बेकायदेशीर वापर तर अनेक आहेत पण कुणी ते कबूल करायला तयार होत नाही

निझामउद्दीन यांच्या टपरीपासून थोड्याशा अंतरावर एक मोठ्या टपरीमध्ये प्लॅस्टिकच्या पुनर्मूल्यवृद्धीचं काम चालतं. या उद्योगातल्या 121 टपऱ्यांपैकी ही एक आहे. एका बाजूला भंगार प्लॅस्टिकची पोती ठेवलेली आहेत. एका ओळीत मांडी घालून बसून काम करणाऱ्या स्त्रिया आणि पुरुषांसमोर प्लॅस्टिकची मोठी सतेली ठेवलेली असतात. प्लॅस्टिकच्या ढिगामधून हे कामगार धड असलेल्या टूथब्रश, इंजेक्शनच्या सिरिंज आणि तत्सम वस्तू बाहेर काढून त्यांची वर्गवारी करत असतात. या कामगारांपैकी कुणीही हातमोजे वापरत नसतं. भंगार प्लॅस्टिक मालाचं वर्गीकरण अत्यंत यांत्रिकपणे चालू असतं. अंतत: सर्व रंगीत प्लॅस्टिक तुकड्यांना एका मशीनमध्ये घालण्यात येतं आणि त्यांचे आणखी बारीक तुकडे होतात. प्लॅस्टिकच्या वस्तू बनवणाऱ्या उत्पादकांना हे छोटे तुकडे वजनावर विकले जातात. प्लॅस्टिकची वर्गवारी करणाऱ्या कामगारांना साधारणपणे 11 तासांच्या कामासाठी दर दिवशी 40 ते 45 रुपये मिळतात.

टपरीच्या बाहेर जिथे प्लॅस्टिक भंगाराची वर्गवारी करण्याचं काम चालतं तिथे मोठाली निळ्या रंगाची पिंपे रचून ठेवलेली दिसतील. प्रत्येक पिंपावर सर्वश्रुत आंतरराष्ट्रीय कंपनीचं चिन्ह असतं. अनेक कंपन्या त्यांची पिंपे दुरुस्तीसाठी इथे पाठवतात आणि किरकोळ किंमतीमध्ये ती दुरुस्त करून घेऊन पिंपे परत वापरली जातात. जी खूपच खराब झालेली असतात, त्यांच्यावर पुनर्वापरासाठीची प्रक्रिया केली जाते. प्लॅस्टिकच्या पुनर्मूल्यवृद्धीचा व्यवसाय इथे सर्वात मोठा आहे. पण आरोग्याला घातक अशी अनेक रासायनिक द्रव्ये अद्यापही या पिंपामध्ये असतील तर त्यांचं काय? ही पिंपे हाताळणारे कामगार स्वत:चं रक्षण करतात का? असले

प्रश्न कधीच विचारले जात नाहीत. या प्रकारचा व्यवसाय चालवणाऱ्यांच्या मनात हे प्रश्न कधीही उमटत नाहीत आणि सनोला कंपाऊंडमध्ये काम करून घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना तर याच्याशी काहीच देणं-घेणं नसतं. नामानिराळा राहून त्यांना हे दाखवता येतं की ते त्यांच्या कामगारांची किती चांगली काळजी घेतात. त्यांच्या कारखान्याच्या फाटकाबाहेर केल्या जाणाऱ्या कामांची त्यांच्यावर काहीच जबाबदारी नसते. जरी यातली काही कामे ही त्यांच्या कंपनीसाठीच केली जात असली तरीही. म्हणूनच मुंबईत अगदी धारावीतल्या सनोला कंपाऊंडमध्येच आपल्याला पहिलं जगं - तिसरं जग यांच्यातल्या राजकारणाचा नमूना पाहायला मिळतो.

13व्या कंपाऊंडमध्ये हर एक गोष्टीवर पुनर्मूल्यवृद्धीसाठी प्रक्रिया होते. कापडाच्या चिंध्या, लोखंडी भंगार, रिकामे डबे, बाटल्या आणि प्लॅस्टिकची पिंप. इथल्या लहान-मोठ्या अशा एकूण 722 व्यवसायांपैकी फक्त 359 जणांकडे कायदेशीर परवाने आहेत. यातले बहुसंख्य छोटे उद्योग असून त्यातले काही अगदी पोटमाळ्यांवर चालवले जातात. एन.एस.डी.एफ.च्या सर्वेक्षणातली एक आश्चर्यकारक नोंद म्हणजे इथे कुठेही बालकामगार नाहीत. धारावीत आणि शहरात इतरत्र चालणाऱ्या पुनर्मूल्यवृद्धीच्या व्यवसायामध्ये आपल्याला बालकामगार विशेष करून आढळतात. या पार्श्वभूमीवर म्हणूनच सर्वेक्षणातली ही नोंद आपल्याला चकीत करते. इथले बहुसंख्य कामगार 21 ते 50 या वयातले होते. अर्थात सर्वच कामगार रोजावर काम करत असल्यामुळे यातली सर्व माहिती / तपशील आपल्याला प्रातिनिधिक स्वरुपाचा धरता येणार नाही, कारण इथले कामगार सतत बदलत राहणार हे वास्तव आहे.

हे उद्योग ज्या जागेवर उभे राहिले आहेत ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. निम्म्यापेक्षा अधिक गोदाम मालकांकडे फोटोपास आहेत, ज्यांना इथे ‘पासपोर्ट’ म्हटलं जातं! आणि ते त्या जागेचं भाडंही भरतात. त्यामुळे कामासाठी यापेक्षा अधिक चांगली जागा मिळेल अशी निझामउद्दीन यांना आशा वाटते. पण या व्यवसायाचं भविष्य कुणालाच माहीत नाही. चर्मोद्योग जसा धारावीतून नाहीसा झाला तसे हा व्यवसाय देखील नाहीसा होऊ शकतो. शहारतल्या मोक्याचा भाग असल्यामुळे इथे निवासी योजना आकार घेऊ शकतात. कुणास ठाऊक?

## कुंभाराचं चाक

पितळी बकलं बनवणारे किंवा भंगारमालाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवसायात असणाऱ्यांच्या तुलनेत धारावीतले कुंभार अधिक सुदैवी म्हणायचे. त्यांच्याकडे निदान जागा तरी अधिक आहे. हे जरी असलं तरी त्यांचंही आयुष्य कष्टाचंच आहे आणि दिवसाच्या शेवटी यांनाही कुठला सोन्याचा हंडा मिळणार नसतो.

धारावीतल्या कुंभारवाड्यात जन्माला आलेले रामजीभाई पिठाभाई पटेल, सौराष्ट्रातून मुंबईत येऊन काम केलेल्या कुंभारांच्या सहा पिढ्यांचं प्रतिनिधीत्व करतात. जुनागड, वेरावळ आणि उना येथून ही मंडळी स्थलांतरित होऊन मुंबईत आली. धारावीतली साडेबारा एकरांची अगदी मोक्याची जागा कुंभारवाड्यानं व्यापली आहे. 90 फुटी रस्ता आणि 60 फुटी रस्ता जिथे मिळतात, तिथे कुंभारवाडा वसला आहे. या भागात एकूण 250 पेक्षा अधिक कुंभार काम करतात आणि यापेक्षाही कितीतरी अधिक कुटुंबे इथे राहतात. कुंभाराव्यतिरिक्त उत्तर प्रदेशमधले काही मुस्लिम इथे राहतात आणि या व्यवसायात नसलेले मराठी लोकही इथे आहेत.

एरवी थांबून बोलायलाही रामजीभाईंना वेळ नसतो. पण आज एकादशी असल्यामुळे ते थोडे निवांत आहेत. कारण एकादशीला कुंभार लोक त्यांच्या चाकाला विश्रांती देतात. ज्या खोलीत आम्ही बोलत आहोत ती खोली स्वयंपाकखोली आणि झोपायची खोली, दोन्हीही आहे. पाळण्यात ठेवलेला रामजीभाईंचा नातू सारखा रडतोय. 60 वर्षांच्या त्यांच्या पत्नी मोतीबाई आमच्यासाठी चहा बनवत आहेत. मोतीबाई फक्त काठेवाडी भाषा बोलू शकतात.

रामजीभाईंचे पूर्वज मुंबईत का आले? माझा प्रश्न. यावर रामजीभाई सांगतात ''त्यांच्यासाठी तिथं काहीच काम नव्हतं.'' ते पुढे सांगतात, ''मध्यमुंबईत चित्रा सिनेमासमोर म्हणजे नायगावमध्ये पहिला कुंभारवाडा होता. तिथून शासनानं त्यांना धारावीच्या उत्तरेकडे शीव येथे हलवलं. तिथे लष्कराचा तळ आल्यामुळे मग त्यांना 1930 मध्ये धारावीत हलवण्यात आलं. 1932 च्या आगीत कुंभाराच्या सर्व झोपड्या जळून भस्मसात झाल्या. वेलजी लखू सेठ नावाच्या एका गृहस्थानं हे सर्व काही पाहिलं होतं. आम्ही त्यांना सांगितलं की आम्हाला फक्त घरं हवीत, बाकी गोष्टींचा बंदोबस्त आमचा आम्ही करू.

मग लखू सेठ यांनी बिर्ला, टाटा यांच्यासारख्या धनिक घराण्यांकडून देणग्या गोळा केल्या आणि आत्ताच्या ठिकाणी त्यांची घरं बांधायला कुंभारांना मदत केली. रामजीभाई यांच्या वडिलांनी त्या काळी बांधलेल्या घरात रामजाभाईंचा जन्म झाला. आज ते त्याच घरात त्यांची पत्नी, चार मुलगे, सुना आणि 10 नातवंडांसमवेत राहतात.

''मी जेव्हा इथे लहानाचा मोठा झालो तेव्हा ही सर्व मोकळी जागा होती. लोक धारावीला यायला घाबारायचे. त्यांना ते एक जंगलच वाटायचं. इथून आम्हाला माहीम स्टेशन दिसायचं. आम्हा काठीवाडी लोकांचं एक संघटन होतं, त्यामुळे आम्हाला सुरक्षित वाटायचं. साधारणपणे 40 वर्षांपूर्वी जेव्हा बाहेरून लोक यायला लागले तेव्हापासून इथे गोष्टी बदलायला लागल्या.''

धारावीतल्या इतर घरांशी तुलना करत रामजीभाईंचं घर मोठं आहे. ''माती ठेवायला, कुंड्या बनवण्यासाठी आणि भट्टी लावण्यासाठीही आम्हाला जागा लागते. मागच्या अंगणातली भट्टी अनेक कुटुंबे मिळून वापरतात.'' रामजीभाई माहिती पुरवतात.

1932 साली इथे कुंभारांची 319 घरे होती. आज ती 2000 आहेत. 1947 नंतर अनेकांनी जुनागड सोडून मुंबईला स्थलांतर केल्यामुळे इथली कुंभारांची लोकसंख्या वाढली. मुंबईत आधीच स्थिरस्थावर झालेल्या जुन्या कुंभारांनी नव्याने आलेल्यांना आपापल्या वस्त्यांत सामावून घेतलं.

या सामाजासाठी आयुष्य कधीच सोपं नव्हतं. रामजीभाई सांगतात की त्यांना सकाळी सात वाजल्यापासून रात्री सात वाजेपर्यंत काम करावं लागतं. पूर्वी ते स्वतः तयार झालेल्या कुंड्या दादरला घेऊन यायचे. धारावीपासून दादर फार दूर नाही आणि तिथे ते त्या कुंड्या विकायचा प्रयत्न करायचे. परत येताना जशी विक्री झाली असेल त्यानुसार ते किराणामालाच्या दुकानातून त्यांची रोजची खरेदी करायचे. अशा रीतीनं रोज मिळणाऱ्या पैशावरच त्यांचा चरितार्थ चालायचा आणि या कामात संपूर्ण कुटुंब गुंतलेलं असायचं.

आज परिस्थिती थोडी सुधारलेली आहे. कारण भट्टा लावण्यासाठी कामगार ठेवणं त्यांना परवडतं. शिवाय कुंड्यांसाठी ऑर्डर देणारे व्यापारी थेट त्यांच्याकडूनच खरेदी करतात. त्यामुळे माल विकण्याची चिंता त्यांना करावी लागत नाही. पण यामुळे कुंभारांनी त्यांच्या डिझाईनमध्ये आणि म्हणून निर्मिती - मध्येही काहीच वैविध्य आणलेलं नाही. नवीन आरेखन किंवा तंत्र शिकलेल्या एक-दोन हरहुन्नरी कुंभारांचा अपवाद वगळता, बहुसंख्य कुंभार झाडे लावयच्या पारंपरिक कुंड्या आणि पाणी ठेवायचे माठच बनवतात.

भट्टा लावायला अलीकडे कामगार मिळत असल्यामुळे जरी कुंभारांचे शारीरिक श्रम कमी झाले असले तरी कुंड्यांसाठी कच्चा माल मिळवताना आता अधिक अडचणी येतात. ''पूर्वी आम्हाला पार्ले आणि अंधेरीमधून माती मिळायची'' रामजीभाई सांगतात. ''आता आम्हाला विरार, पालघर किंवा आणखीही पुढे जावं लागते. माती मिळवण्यासाठी फार कष्ट करावे लागतात.''

कुंभारवाड्याचाच भाग असलेल्या मुस्लिम कुंभारांच्या कष्टांच्या तुलनेत हे कष्ट फारच सौम्य वाटतील. पिढ्यान्‌पिढ्या हिंदू आणि मुस्लिम एकत्र सलोख्यानं राहिले. पण 1992 नंतर सर्व समीकरणेच बदलली. दूर अयोध्येतल्या घटनांमुळे मुंबई

शहर पेटलं आणि वर्षानुवर्षे शेजारी आणि मित्र यांच्यात फूट पडली. समान व्यवसाय आणि हितसंबंध यांच्या जोरावर दृढ झालेल्या ऐक्याच्या भावनेला तडा गेला.

दंगलीनंतर ज्यांचं आयुष्य पार बदलून गेलं ते इस्माईल खमीसा रामजाभाईंच्या घरापासून काही घरे पलीकडे राहतात. या कुंभारवाड्यात राहणाऱ्या40 मुस्लिम कुंभारांपैकी असलेले इस्माईलभाई 55 वर्षांचे आहेत. हे सर्व कच्छमधून स्थलांतरित होऊन आलेले आहेत आणि ते कच्छी बोलतात. याउलट जे हिंदू कुंभार आहेत ते सगळे उत्तर गुजराथमधून स्थलांतरित होऊन आले आहेत आणि ते गुजराथी भाषा बोलतात. इस्माईलभाई यांचं मूळ गाव रटडिया पण त्यांचा जन्मही कुंभारवाड्यातल्या या घरातला. सारं आयुष्यही इथेच गेलं असल्यामुळे त्यांना कच्छबद्दल फारशी माहिती नाही असं ते म्हणतात.

इस्माईलभाई यांची जगण्यातली उमेदच हरवली आहे. ते आता फारसे कुणात मिसळत नाहीत आणि फक्त काम करत राहतात असं ते स्वतःच म्हणतात. दंगलीमुळे कुंभारवाड्यातलं बरंच काही बदललं, विशेषतः जेव्हा पोलिसांनी या वस्तीत प्रवेश केला आणि दाटीवाटीनं, एकमेकांना खेटून उभ्या असलेल्या घरांवर त्यांनी गोळीबार केला. इस्माईलभाई यांच्या शेजारच्या घरात कोकणातला एक पाहुणा येऊन राहिला होता. स्वच्छतागृहात जाण्यासाठी हा पाहुणा बाहेर आला आणि पोलिसांनी केलेल्या गोळीबारात मरण पावला.

कच्छहून सुरुवातीला जे कुंभार मुंबईत आले त्यापैकीच एक होते इस्माईलभाईंचे वडील. चार किंवा पाचच कुटुंब होती ती. हे सर्व माटुंग्याला राहायचे. शासनानं यांना कुंभारवाड्यात हलवलं आणि तेव्हापासून इस्माईलभाई इथेच राहत आहेत.

इस्माईलभाई सातवीपर्यंत शिकलेले आहेत. त्यांच्या एका मुलाने कॉलेजचे शिक्षण घेतले आहे. दुसरा त्यांच्याबरोबर काम करतो आणि दोन्ही मुलींची लग्नं झाली आहेत त्यांच्या दोन भावांशेजारीच ते कुंभारवाड्यात राहतात.

दररोज सकाळी चार-पाच तास खपून इस्माईलभाई त्यांच्या मुलाच्या मदतीनं 100 मोठ्या कुंड्या बनवतात. एक व्यापारी ठराविक किंमतीनं त्यांच्या कुंड्या विकत घेतो. माल विकण्याच्या तंत्राबद्दल शिकण्याच्या फंदात इस्माईलभाई पडत नाहीत. अधिक प्रशिक्षण घेऊन, आणखी पैसे कमावता येतील हे त्यांना मान्य आहे. धारावीतले कुंभार हा असा एक समाज आहे की जो अनेक वर्षानंतरही गरीबच राहिला आहे

**सोन्याच्या गल्ल्या**

कोळीवाड्यापासून जवळच धारावीतल्या मुख्य रस्त्याच्या बाजूला  धारावीतली सर्वात जुनी चाळ आहे - सकिनाबाई चाळ या चाळीच्या चिंचोळ्या गल्ल्यांना साक्षात सोन्याची झालर आहे. शुद्ध सोन्याची! बाहेरच्या जगापासून दूर, लपलेलं असं हे सुवर्णगृह आहे. येथे सोन्याचं शुद्धीकरण, दागिन्यांची कारागिरी आणि पॉलिशिंगची कामं चालतात.

एका लहानशा खोलीत चार पुरुष बसलेले असतात. हे सर्वजण सांगली जिल्ह्यातून मुंबईत आलेले आहेत. या क्षणी त्यांना काम नाहीये. खोलीत प्रवेश केल्याबरोबर नजरेस पडते कोळशावर चालणारी शेगडी आणि त्यावरचं धुराडं. विस्तवाला वारा मिळवा यासाठी शेगडीच्या बाजूला यांत्रिक भाते आहेत. धुराडं ॲल्युमिनियम धातूचं बनवलेलं आहे आणि खोलीच्या बाजूनं हा पाईप नेऊन तो मग छपरापर्यंत वर नेला आहे. या खोलीत धूर अजिबात नाहीये. पर्यावरणीय दृष्टिकोनातून संवेदनशील अशी कामाची जागा आणि तीही धारावीच्या गाभ्यात असण्याबद्दल आश्चर्य वाटतंच. मुकुंद नगरातल्या ओतकामाच्या भट्ट्यांपेक्षा ही जागा कितीतरी निराळी.

आते हे पुरुष त्यांच्या कामाची प्रक्रिया समजावून सांगतात. सोनं ठेवलेले मातीचे घडे छोट्या आचेवर ठेवले जातात. एकदा सोनं वितळलं की त्याचं वळं बनवून त्याचं वजन केलं जातं. वजनानुसार हे सोनं मग सोनारांना विकलं जातं. जुने दागिने अशा पद्धतीनं मोडून वितळवले जातात. जुनी कर्ज फेडण्यासाठी किंवा नवीन दागिने घेण्यासाठी या सोन्याचा उपयोग करतात.

या खोलीच्या समोरच्या बाजूला तीन तरुण मुलगे बसलेले आहेत. सर्वजण बंगालचे दागिन्याचे कारागीर आहेत. छोट्या उंचीच्या लाकडी टेबलांसमोर हे तिघेजण खाली बसले आहेत. जेमतेम विशी ओलांडलेला दिलीप हा त्यांचा म्होरक्या. लाकूड कोरून केलेल्या भांड्यात ठेवलेल्या निखाऱ्यांवर तो फुंकणीनं फुंकतोय. सोन्याचे लहान लहान तुकडे तो वितळवतोय. वितळलेलं सोनं आता साच्यात ओतलं जाईल आणि थोड्याच वेळात दिलीपनं आणखी एका दागिना घडवलेला असेल. त्यानं नुकतीच बनवलेली रेखीव कलाकुसर असलेली कानातली तो आम्हाला दाखवतो. अंगठ्या, गळ्यातले सर आणि सरींच्या मधली पदकं या प्रकारचे दागिने हे कारागीर घडवतात.

दिलीपनं घडवलेले दागिने पॉलिशिंग कामासाठी सकिनाबाई चाळीच्या दुसऱ्या भागात. तंजावरहून आलेल्या तोडीकडे किंवा अरकॉटवरून आलेल्या पीर महमदकडे पाठवले जातील. रस्त्याच्या बाजूला उघडणाऱ्या अरुंद जागेत ते दोघेही काम करतात आणि या जागेत वरती असलेल्या माळ्यांवर राहतात.

सोन्याचं पॉलिश हे हातानं केलं जातं. एका प्लॅस्टिकच्या डेचक्यात रिठ्याचं फेसाळ पाणी असतं. या पाण्यात दागिने बुचकळून छोट्या ब्रशनं त्यामध्ये अडकलेली सर्व घाण काढली जाते. नंतर पोटॅशियम साइनाडचे द्रावण असलेल्या एका डेचक्यात हे दागिने बुचकळले जातात. कामगार सारं काम हातामोजे न घालताच करतात. हे खूप धोकादायक आहे असं मी उद्गारल्यावर दोघंही पुरुष या कृतीतला धोका मान्य करतात पण असंही म्हणतात की त्यांना या कामाची सवय झाली असल्यामुळे ते याबद्दल फार विचार करत नाहीत.

ज्या खोल्यात कारागीर दागिने घडवतात, त्या खोल्यांच्या बाहेर, मुख्य रस्त्यावर, ओळीनं सोन्याच्या दागिन्यांची दुकानं आहेत. इथल्या मुख्य बाजारपेठेवर लक्ष ठेऊन, खास करून तमिळी घाटाचे दागिने बनवले जातात. बरीचशी दुकानं जरी गुजराथी लोकांच्या मालकीची असली तरी सर्व दुकानावरच्या पाट्या तमिळ भाषेतल्या आहेत. या व्यवसायात तुम्हाला विविध राज्यातले लोक गुंतलेले दिसतील - महाराष्ट्र, गुजराथ, बंगाल आणि तामिळनाडू या व्यवसायात हिंदू आणि मुसलमान अशा दोन्ही धर्मातले लोक आहेत. दंगलीच्यावेळी सकीनाबाई चाळ हा धारावीतला असा भाग होता की जिथे राहणाऱ्या मोजक्या मुस्लिम कुटुंबाचं रक्षण त्यांच्या हिंदू शेजाऱ्यापाजाऱ्यांनी केलं होतं.

## नवीन उद्योग, नवीन भरती

### धारावीत साबण बनविण्याचं काम चालू आहे.

अपेक्षित आणि अनपेक्षित अशा दोन्ही प्रकारचं उत्पादन धारावीमध्ये सापडतं. त्यामुळे तिथे बेकऱ्या आणि मातीच्या कुंड्या बनवण्याचे उद्योग आहेत यात काहीच विशेष नव्हे. पण साबण? धारावीत तीन किंवा चार साबण बनवणारे 'कारखाने' आहेत आणि बहुतांश साबण तिथेच विकला जातो. असेच एक साबण निर्माते आहेत अरुमई नायकम. 1979 साली त्यांचे वडिल हिंदुस्थान लीव्हरच्या मुंबईतल्या शिवडी इथल्या साबणाच्या कारखान्यातून निवृत्त झाल्यानंतर अरुमई तिथे लागले. 1989 साली कंपनीनं टाळेबंदी जाहीर केल्यानंतर अरुमई यांनाही वाटलं की आता बाहेर पडण्याची वेळ आली आहे. हिंदुस्थान लीव्हरच्या फॅक्टरीमध्ये त्यांना जे काही शिकायला मिळालं होतं, त्या सगळ्याचा त्यांनी स्वत:चा छोटा उद्योग सुरू करण्यासाठी उपयोग केला.

आज ते प्रती दिवशी दोन टन डिटर्जंट साबणवडी बनवतात. राधा, झमा आणि सेफिल अशा वेगवेगळ्या नावांनी हा माल धारावीत मोठ्या प्रमाणावर विकला जातो. हिंदुस्थान लीव्हरनं किंवा इतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी उत्पादित केलेल्या मालाशी नायकम यांनी बनवलेल्या साबणाचं अगदी तंतोतंत साम्य आहे पण त्या मालाच्या किंमतीच्या एक चतुर्थांश किंमतीत नायकम त्यांचा माल धारावीत विकतात कारण इथली बाजारपेठ अगदी पक्की, आरक्षित असल्यासारखी आहे.

नायकम यांच्या कारखान्यात रोजावरच माणसं कामावर ठेवली जातात आणि ते रोज जितकं उत्पादन

करतील त्यानुसार पैसे दिले जातात. एका छोट्या खोलीत ठेवलेल्या दोन-तीन मशीनींच्या सहाय्याने एक डझनभर कामगार साबण बनवतात आणि स्त्री कामगार साबणाचं पॅकिंग करतात. विशेष म्हणजे हिंदुस्थान लीव्हर कंपनीनं टाळेबंदी जाहीर केली तेव्हा तिथल्या कामगारांनी देखील निषेधाचा भाग म्हणून साबण निर्मितीला सुरुवात केली होती. या साबणाचं नावच मुळी 'लॉकआऊट' साबण असं ठेवलं होतं! आणि कामगार संघटनेसाठी निधी उभारण्यासाठी हा साबण विकला जायचा.

नायकम यांनी बनवलेल्या साबणासारखेच आणखी काही स्थानिक पातळीवर बनवलेले साबण धारावीच्या बहुतांश भागात विकले जातात. हा मुख्यत्वे कपड्यांसाठीचा डिटर्जंट साबण असतो. पण बहुराष्ट्रीय कंपन्यांनी बनवलेल्या साबणाच्या किंमतीत आणि स्थानिक पातळीवर बनवलेल्या, कुठलंच मोठं व्यावसायिक नाव मागे नसलेल्या साबणाच्या किंमतीत असलेला फरकच तो साबण धारावीत हमखास आणि भरपूर विकला जाण्याची हमी देतो.

धारावीत स्थलांतरित होणाऱ्या प्रत्येक नव्या लाटेनं तिच्याबरोबर एका नव्या व्यवसायाचं बी तिथं रुजवलं आहे. धारावीतले सर्वात अलिकडचे उद्योजक आहेत बिहारी. ते संख्येनं नेमके किती होते हे कुणालाच माहीत नाही. कारण अगदी अलिकडे कुठलं सर्वेक्षण झालेलं नाही. 1986 च्या एन.एस.डी.एफ. सर्वेक्षणानं फक्त 75 बिहारींची नोंद केली होती. आज त्यांची संख्या यापेक्षा नक्कीच अधिक आहे. कारण ते सर्व व्यवसायात दिसतात आणि विशेष करून चामड्याचा तयार वस्तूंच्या व्यवसायात. त्यांच्या इथे येण्याबाबत सर्वात कडवटपणे प्रतिक्रिया व्यक्त करतात चर्मोद्योगातले जुने मराठी कारागीर. ''ते (बिहारी) काय इतर कुणीही मागेल त्याच्या निम्म्या किंमतीत काम करतील.'' एक कामगार म्हणाला, ''परिणामी आमची कामं हातची जातायंत आणि हे लोक आत घुसताहेत.''

बिहारच्या चंपारण जिल्ह्यातून चार वर्षांपूर्वी अब्दुल मलिक धारावीत असाच रोजी-रोटीच्या शोधात आला. आता पांढरे केस, दाढी असलेल्या अब्दुल याचं नेमकं वय सांगणं कठीण आहे. यांच्या दुकानात सुटकेसच्या झिप्स, हॅन्डल्स आणि चामडी पट्टे विकले जातात. चामडी पट्टे त्यांच्या घरातच बनवले जातात. सुटकेस दुरुस्तीची कामंही अब्दुल यांच्या दुकानात केली जातात.

''मुंबईचं नुसतं नाव ऐकूनही आमच्या गावाकडे लोकांना अचंबा वाटायचा'' असं ते म्हणतात. महानगरीत आल्यनंतर अब्दुल यांनी खूप वेगवेगळ्या प्रकारची, किरकोळ कामं केली. 1996 साली त्यांनी सुटकेस, पट्टे आणि चामडी पिशव्या बनवायला सुरुवात केली.

अब्दुल मलिक यांच्या घरातच त्यांचा कारखाना आहे. माळ्यावर बिहारमधून आलेले काही कामगार चामड्याचे पट्टे बनवत असतात. एका दिवसात एक माणूस वेताच्या दर्जाचे 100 आणि उत्तम दर्जाचे 25 चामडे पट्टे बनवू शकतो. कामाच्या ठिकाणीच बहुसंख्य कामगार झोपतात. दरमहा 550/- रुपयांमध्ये एका माणसाला दिवसाकाठी दोन वेळा जेवण देणाऱ्या खाणावळीत त्यांची जेवणाची व्यवस्था होते.

दंगलीच्या वेळी इथले खूप बिहारी पळून गेले असं अब्दुल मलिक यांचं म्हणणं. पण वातावरण शांत झाल्यानंतर ते सर्व परत आले आणि येताना सोबत आणखी बिहारींना घेऊन आले. नव्यानं आलेल्यांमध्ये तरुण मुलगेही आहेत. धारावीत ते नेमके किती आहेत याचा कुणालाच अंदाज नाही. एक अंदाज असा आहे की धारावीच्या विविध कारखान्यात सुमारे 15000 बिहारी तरुण काम करत आहेत. सर्वच व्यवसायांमध्ये / उद्योगांमध्ये ते आढळतात. मतदारांच्या यादीत त्यापैकी कुणाचीच नावं नाहीत हे मलिक कबूल करतात. म्हणजेच अधिकृतरित्या हे लोक अस्तित्त्वात नाहीत.

या मुलांना कामावर ठेवणाऱ्या काहीजणांच्या मते, अतिशय कमी पैशात काम करण्याची या मुलांची तयारी असते. 500/- रुपयांसाठी संपूर्ण वर्षभर काम करायला हे तरुण तयार असतात. ही रक्कम ते त्यांच्या आईवडिलांकडे पाठवून

देतात. धारावीत त्यांना राहायला जागा, जेवण मिळतं आणि कुठल्या तरी व्यवसायाचं प्रशिक्षणही दिलं जातं. दोन वर्षानंतर ही मुलं कामात चांगली तयार होतात आणि मग स्वतंत्रपणे कमवू शकतात.

### काही भविष्य आहे का?

धारावीत उद्योगांचे, कारखान्यांचे, व्यवसायांचे, धंद्यांचे असंख्य प्रकार, आणि त्यामध्ये भरपूर वैविध्य असूनही आजही धारावीकडे एक निवासी भाग म्हणूनच मुख्यत: पाहिलं जातं. धारावीच्या पुनर्विकासाचे सर्व आराखडे एकाच मुद्यावर लक्ष एकवटून असतात आणि तो मुद्दा म्हणजे धारावीतल्या रहिवाश्यांना घरं देण्याचा. पण या संदर्भात हेही लक्षात घेणं महत्त्वाचं आहे की हे लोक धारावीत राहतात कारण त्यांना इथे काम-धंदा मिळतो. धारावी हा मूलत: एक औद्योगिक विभाग आहे हा मुद्दा पुढे रेटण्याचा खूप प्रयत्न एन.एस.डी.एफ. आणि धारावी विकास समिती यांनी संयुक्तपणे केला पण शासन त्याकडे लक्षच द्यायला तयार नाही.

याचं एक कारण मुंबई विकास आराखड्यामध्ये आहे. या महानगरीच्या बेटावर बसलेल्या भागातील गजबजाट, अती दाट वस्ती कमी करण्याचं चित्र हा आराखडा बनवणाऱ्यांनी रंगवलं होतं. याचाच अर्थ असा होता की फक्त कारखानेच बाहेर हलवायचे असं नाही पण नव्यानं सुरू होणाऱ्या उद्योगांनादेखील परवानगी नाकारायची.

डी.टी. जोसेफ यांना या संदर्भात असं वाटतं की रोजगारांसाठी कुठलंही नियोजन नसणं, हीच मुंबई विकास योजनेतली प्रमुख त्रुटी होती. ''कुठल्याही नागरी विभागात सर्वात अधिक भर माझ्या मते रोजगारावर असतो. नाही तर नागरीकरण / शहरीकरण याचा मुख्य संदर्भ काय? आपण इतिहास नीट समजून घेतला तर लक्षात येईल की ग्रामीण भागातून लोक शहराकडे येतात म्हणून परिमाणावर आधारित व्यय-संकोच (इकोनॉमीज ऑफ स्केल) घडतो. याचाच अर्थ असा की रोजगारापासूनच सुरुवात केली पाहिजे. पण विकासाच्या आराखड्यासारख्या कुठल्याही शहरी योजना जर तुम्ही पाहिल्यात तर त्यावर रोजगारावर एकही शब्द नसेल.''

शहरी नियोजनाच्या कामात बरीच वर्ष सक्रियरित्या सहभागी असलेले जोसेफ त्यांचा निष्कर्ष मांडताना म्हणतात की मुंबईच्या नियोजनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सर्वस्वी चुकीचा होता. हा दृष्टिकोन उच्चभ्रू होता आणि बेटावद् वाढलेल्या शहराच्या संदर्भात तर हा मुद्दा विशेषत्वानं जाणवतो. या नियोजनात लोकांच्या गरजांकडे पूर्ण लक्ष दिलं गेलं नव्हतं. ते म्हणतात, ''मला तर हल्ली असं वाटायला लागतं आहे की झोपडपट्टी पुनर्विकासामध्येही जे उपलब्ध आहे ते अधिक चांगलं / दर्जेदार कसं बनवता येईल याचाच विचार करायला हवा. धारावीतले लोक जर उद्योजक आहेत, उत्पादक आहेत, त्यांचा माल निर्यात करत आहेत, व्यवसाय छान करत आहेत तर ते खऱ्या अर्थाने व्यावसायिक आहेत. आता या व्यावसायिकांना अनुरूप असा कुठला निवास आहे? तुमचे नियम असे असले पाहिजेत की त्यांच्यामुळे तिथून बाहेर पडणं त्यांचं त्यांना शक्य होईल.''

शहर नियोजनाकडे बघण्याचा भारतातला दृष्टिकोन अजूनही वसाहतवादी संकल्पनांमध्ये अडकल्यासारखा वाटतो आणि या संकल्पना सध्याच्या वास्तवाला अनुरूप अशा नाहीत. म्हणजे एकीकडे शासन शहरात बगिचे, शाळा, दवाखाने यासाठी नियोजन करणार पण गरीबांच्या घरांच्या, त्यांच्या रोजगाराचा विचार करणार नाही, त्याचं नियोजन करणार नाही. गरीबांची रोजगाराची ठिकाणं, उदा. कारखाने जर शासनानं हलवले तर शहराच्या काही भागात राहण्याचा गरीबांचा हक्कच हिरावून घेतल्यासारखे होईल. यामुळे शहराचे जाणीवपूर्वकरित्या भाग पडतात. सर्व प्रकारच्या सेवा सुविधांचा लाभ फक्त एक ठराविक 'आहे रे' वर्ग घेतो आहे असा एक भाग आणि दुसऱ्या कुठल्याही कारणासाठी नको असलेल्या जमिनीवर आणि दलदलीत गरीब लोक कसेबसे राहत आहेत असा दुसरा भाग.

औद्योगिक धारावीची वाढ मात्र जोमानं झाली. अनेक

उद्योग भरभराटीला आले कारण धारावीत चालणाऱ्या अनेक बेकायदेशीर उद्योगातून शासनाचा अप्रत्यक्ष फायदाच होतो. अनेक उद्योग त्यांच्या कामाच्या स्वरुपामुळे कर चुकवतात पण हे उद्योग असेच चालू ठेवण्यासाठी त्यांना कितीतरी पटीनं अधिक 'कर' अप्रत्यक्षरित्या भरावे लागतात. पोलिस, महानगरपालिकेचे कर्मचारी, आणि खूपदा स्थानिक दादा लोकांना, नियमित हप्ते भरावे लागतात. जर हे उद्योग कायदेशीर केले तर त्यांचा खर्च कदाचित खूप कमी होईल.

मुंबई शहरात फेरीवाल्यांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. सर्व प्रकारच्या वस्तू विकणारे हे फेरीवाले शहरातले बरेच पदपथ व्यापून टाकतात. बहुसंख्य सर्वसामान्य लोकांना फेरीवाले हवे असतात कारण त्यांच्या घराजवळ त्यांना स्वस्तात सर्व प्रकारच्या वस्तू मिळतात, पण महानगरपालिका फारच कमी जणांना वस्तू विकण्याचे परवाने देते. बाकीचे सर्व बेकायदेशीर मानले जातात आणि शहरभर फिरणाऱ्या महानगरपालिकेच्या गाड्यांच्या भयातच ते जगतात. फेरीवाल्यांच्या गटावर या महानगरपालिकेच्या गाड्या धाडी घालतात, विक्रेत्यांचा सर्व माल जप्त करतात आणि त्यावर जबरदस्त दंड वसूल करतात. शिवाय पोलिस आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना फेरीवाले जो रोजचा हप्ता देतात तो वेगळाच. फेरीवाल्यांच्या विविध संघटना आणि संस्था गेली काही वर्षे एकच मागणी करत आहेत व ती म्हणजे की त्या सर्वांना रीतसर परवाने दिली जावेत. तसेच शहराचे काही भाग नेमून द्यावे जेथे त्यांना माल विकण्याची परवानगी असेल. पण महानगरपालिका आणि फेरीवाले / पदपथावरले विक्रेते यांच्यातला तिढा सुटलेला नाही आणि म्हणून मुंबईतल्या पदपथांवर दोन्ही म्हणजे कायदेशीर आणि बेकायदेशीर फेरीवाले ठाण मांडून बसतात आणि काहीच बदलत नाही.

मुद्दा फक्त कायदेशीर असण्याचा नसून या प्रकारचा अनियंत्रित उद्योग म्हणजे लोकांमधल्या कौशल्याची, गुणांची आणि उद्योगशीलतेचीही ही नासाडी करण्यासारखं आहे. शिवाय आपलं काम कसं बिनउपयोगाचं आहे हे आपणच लिहिण्यासारखा हा उद्योग आहे. चामड्यापासून तयार होणाऱ्या वस्तुंचेच उदाहरण पहा ना. जोपर्यंत चामडे कमावण्याचे, त्यावर प्रक्रिया करण्याचे तंत्र आंतरराष्ट्रीय दर्जापर्यंत उंचावत नाही तोपर्यंत चामड्याच्या वस्तू तयार करणारे कारागीर कितीही कसबी असले तरी निर्यातीच्या बाजारपेठेचा त्यांना काही उपयोग करून घेता येणार नाही. खुद्द धारावीमध्ये चामड्याच्या तयार वस्तू करण्याच्या उद्योगात हे सिद्ध झालेलं आहे. लोक एकमेकांशी स्पर्धा करत जवळजवळ उत्पादन किमतीलाच वस्तू विकत आहेत जेणेकरून त्यांची गुंतवणूक तरी त्यांना परत मिळावी. याचं दुसरं कारण म्हणजे मालाची निर्यात करण्यासाठी मालाचा जो दर्जा राखायला पाहिजे तो राखणं बहुसंख्य उत्पादकांना जमत नाही. उच्च दर्जाच्या चामड्यापासून सुबक, दर्जेदार, नावीन्यपूर्ण वस्तू बनवण्याऐवजी, दागिने ठेवण्याच्या पेट्यांसारख्या मोठ्या संख्येने खपणाऱ्या पण कमी दर्जाच्या वस्तूच धारावीमध्ये बनवल्या जातात.

चर्मोद्योगाप्रमाणेच तयार कपडे बनवण्याच्या उद्योगामध्ये माल निर्यातीसाठी बनवण्यऐवजी बहुसंख्य उद्योजक स्थानिक बाजारपेठेत खपणारा माल बनवत आहेत. कपडे शिवण्याचं काम इतक्या जणांकडे 'जॉबवर्क' म्हणून दिलं जातं की पाश्चिमात्य देशांमध्ये सर्वच उत्पादनांमध्ये जो नियंत्रित दर्जा अपेक्षित आहे तो इथे राखणे शक्यच होत नाही. परिणामी मालाची निर्यात म्हणून जी काय होते ती आखाती देशात होते आणि त्यामुळे अगदी ठराविक प्रकारचे कपडेच तिकडे मागणीनुसार पाठवले जातात. बाकी तयार कपड्यांचा व्यवसाय म्हणजे मुख्यत्वे शर्ट बनवणे. आणि केवळ मुंबईतच नाही पण देशभरातील लहानलहान गावात औपचारिक आणि अर्ध-औपचारिक क्षेत्रात मोठ्या संख्येने काम करणाऱ्या पुरुषांना ते स्वस्त किंमतीत विकणे.

या उद्योगातला नफा इतका कमी असतो की या व्यवसायातले कुशल कामगार सातत्यानं बाहेर फेकले जातात.

कमी कुशल आणि कमी पैशात काम करणारे यांची जागा पटकावतात. चर्मोद्योगांतही असंच घडलं आहे. अनेक पिढ्यांचा अनुभव गाठीशी असलेले या व्यवसायातले कसबी मराठी कामगार आता असेच व्यवसायाच्या परिघाबाहेर फेकले गेले आहेत. बिहारमधून मोठ्या संख्येने मुंबईकडे धावणाऱ्या बिहारी तरुणांच्या लोंढ्याबद्दल हे मराठी कामगार अत्यंत कडवटपणे तक्रार करतात. त्यांच्या तुलनेत अर्ध्यापेक्षाही कमी कौशल्य असणाऱ्या या तरुणांना निम्म्या वेतनावर नोकऱ्या दिल्या जातात. आज या व्यवसायात लागणारं कौशल्यच मूळात फारसं उच्च दर्जाचं नसल्यामुळे नवीन कामगाराला तेवढं कौशल्य आत्मसात करायला अनावश्यकता निर्माण होते. औपचारिक क्षेत्रातही कंपन्या कामगार कमी करून काही कामं बाहेरून करून घेत आहेत. या कामगारांसाठी काहीतरी तरतूद असते. पण अनौपचारिक क्षेत्रातले काढून टाकलेले कामगार विसंबू शकतील असे काहीच पर्याय त्यांच्यासमोर नसतात.

धारावीच्या संदर्भात शासनापुढे दोन पर्याय आहेत. एक तर औद्योगिक क्षेत्र म्हणून धारावी घोषित करावी आणि त्यातल्या काही कारखान्यांना लघु-उद्योग म्हणून रीतसर परवानगी द्यावी. दुसरा पर्याय हा की धारावीतले उद्योग बेकायदेशीर आहेत असं मानणं चालू ठेवणं आणि ते थांबवण्यासाठी काहीही न करणं. शासनानं जर दुसऱ्या पर्यायाची निवड केली आणि शासनाची आधीची वृत्ती, दृष्टिकोन पाहता याच पर्यायाची निवड होण्याची शक्यता अधिक, तर धारावीतले बहुसंख्य कामगार आजवर करत आले तसंच अत्यंत अस्वच्छ, कोंदट, अपुऱ्या जागेत काम करत राहतील आणि तिथे भविष्यातली कामाची सुरक्षितताही शून्यच राहील.

लघुउद्योग असलेलं औद्योगिक क्षेत्र अशी जरी धारावीला मान्यता मिळाली तरी सध्या तिथे चालू असलेल्या उद्योगांना / व्यवसायांना त्यांचं तंत्रज्ञान सुधारण्यासाठी काही भांडवल गुंतवावं लागेल. कायदेशीररित्या व्यवसायात तगून राहण्यासाठी त्यांना ज्या दर्जाच्या वस्तुंचं / मालाचं उत्पादन करावं लागणार आहे ते त्यांना सध्याच्या त्यांच्या कमी कौशल्याच्या आणि कमी तंत्रज्ञानाच्या स्थितीमुळे करता येणं शक्यच नाही. उत्पादन, दर्जा, तंत्रज्ञान, कौशल्य या सगळ्या बाबतीत वरचा दर्जा गाठायचा का उत्पादन व्यवसायाला रामराम ठोकून बाहेर पडायचे यात निवड करावी लागेल.

**चिनार पब्लिकेशन्स यांच्याकडून साभार**

▪ ▪ ▪ ▪ ▪

